श्री म्हाळसा देवी प्रसन्न.

अनंत रंग.

हें पुस्तक,

दत्तात्रय गोविंद सडेकर,

बुकसेलर्स खानापूर यांनीं केलें तें,

सखाराम गोविंद सडेकर,

यांनीं

"बेळगांव-समाचार" छाप० छा०

आवृत्ती पहिली.

प्रती १०००.

सन्न १८९१.

किंमत १० आणे.

वाचकहो ?

या चिमुकल्या पण सुंदर अशा पुस्तकाला प्रस्तावना काय कामाची? कारण यांतील बहुतेक विषय कृष्णक्रीडेपैकीं (शृंगारपर) आहेत. ह्मणून इतकेंच सुचवितों कीं तुह्मीं नीट लक्ष्य लावून सबंध पुस्तक एक वेळ वाचा, ह्मणजे यांतील मर्म समजेल. झालें!! व्यर्थ बडबड करून वाचकांचा अमोल्य वेळ दवडण्यांत अर्थ काय? हें पुस्तक सर्वकाळ तुमच्या उपयोगीं पडावें अशी इच्छा आहे ती श्री कुलस्वामिणी पूर्ण करो.

यांत हस्तदोषामुळें कांहीं चुका राहिल्या असल्यास त्याची वाचक क्षमाकरून त्या अवश्य कळवितील अशी आशा आहे.

खानापूर ता० २५।२।९१. } सर्वांचा आश्रित, दत्तात्रय गोविंद सडेकर.


अनुक्रमणिका.

श्लोक.

कामी लोक तयांसही निजकथा प्रीतिप्रद श्री हरी ॥ विश्वोद्धारानिमित्त गोप ललना क्रीडा विचित्रा करी ॥ ऐसें आपणही करूं ह्मणउनी जो कां अपेक्षा धरी ॥ थोडेंसें विषतो गळां न मिरवी कांहो शिवाचे परी ॥ १ ॥ ॥ ॥

श्री म्हाळसादेवीप्रसन्न.

अनंत रंग प्रारंभ.



हनुमंत स्तवन.

जो ध्यातसे पवन-पुत्र रघूत्तमातें ॥ तो प्राणमु ख्य तरि त्या कपि-सत्तमातें ॥ जे सेविती प्रकट राघव त्यास होतो ॥ चिंतीं स्मरा म्हणवुनीं हनु मंत होतो ॥ १ ॥ वेध राघव विलास कळांचा ॥ प्राणमुख्य कपितो सकळांचा ॥ राम-भक्ति हृद यींच निघाली ॥ त्यासि जो स्वमानें आणुनिघा ली ॥ २ ॥ जेथें विलास रघुनंदन-गायनाचे ॥ तेथें समीर सुत आपण गाय नाचे ॥ जोडूनि अं जलिपुट स्वशिरावरी तो ॥ ऐके स्मरोनि रघुवंश वरावरी तो ॥ ३ ॥ एक्याउडाणेंचिउडे समुद्रा ॥ दे राघवाची क्षितिजेस मुद्रा ॥ जो जानकी वृ त्त रघूत्तमात्तें ॥ सांगे स्मरा त्या कपिसत्तमा

तें ॥ ४ ॥ राघवाविण रुचे न मनातें ॥ धन्यजा सिकारिती नमनातें ॥ वायु-पुत्र सुचारित्रचि साचा ॥ वामनीं तरिच आदर साचा ॥ ५ ॥

सामुद्रिक.

स्त्री पुरुषाचें आयुष्य पाहून उभयतांचें लक्षण पहावें कारण आयुष्य रहीत जीं स्त्रीपुरुषें त्यांचीं उत्तम लक्षणें पाहून काय करावीं? या साठीं आयुष्य परिक्षा जी पूर्वीं शंकरानें पार्वतीप्रत कथन केलीहोती ती संक्षेपानें सांगतों. हीं लक्षणें पुरुषाच्या उजव्या आणि स्त्रीच्या डाव्या हस्तावर ब्रह्मदेवानें लिहिलीं आहेत.

पुरुष लक्षण.

ज्या पुरुषाच्या हातावर फार रेषा आहेत त्या क्लेश कारक, थोड्या असलेस धन नाशक, चारच असतील तर सुखदायक, चहोंवर अधिक असल्यास दारिद्र्य दायक होत. ज्याच्या हातावर चक्राप्रमाणें चिन्ह असेल, तो पंडित होईल. आणि शंखाप्रमाणें चिन्ह असेल तो विद्वान शास्त्री होईल. मच्छाप्रमाणें चिन्ह असेल तो व्यापारविद्येंत फारच कुशल होईल. ज्या मनुष्याच्या शेवटल्याबोटावरील ऊर्ध्व रेषा त्या बोटाच्या वरपासून तलापर्यंत जर मिळाली असेल तर त्याचें आयुष्य १०० वर्षें असून तो प्राणी आपलें बहु-

तेक आयुष्य परदेशांत घालवील. कोणत्याही मानवी प्राण्याच्या दहा बोटांवर जितके वेढे असतील त्या सर्वांची बेरीज करून त्या बेरजेस तिनींनीं भागावें आणि जर भागाकार अकरा किंवा बारा आला तर तो पुरुष बहुत धन संचय करून उत्तम गुणवान होत्साता सुखानें कालक्रमणा करील. तोच भागाकार १३ आला तर तो प्राणी दुःखी होईल,

चवदा, पंधरा, सोळा, अगर सतरा आला तर जुगारी व दुष्टकर्म करणारा होईल. अठरा आला असतां तो प्राणी नानाप्रकारचें सुख भोगील. एकुणीस, वीस, किंवा एकवीस आला तर तो प्राणी मोठा अबरुदार बुद्धिमान आणि सुखी असा होईल.

ज्या पुरुषाचे डोळे आरक्त, देह सोन्यासारिखा गोरा, हात जानूपर्यंत लांब सर्वांग मांसल त्या मनुष्या जवळ निरंतर लक्ष्मी असून ऐश्वर्यसुख प्राप्त होईल.

ज्या पुरुषाच्या मांड्या लांब त्यास धन आणि धान्य प्राप्ती मस्तक लांब व मोठें असल्यास नृपश्रेष्ट होईल. कमर मोठी असेल तर नानाप्रकारचें स्त्रीसुख होऊन पुत्र बहुत होतील. पाय विस्तीर्ण असल्यास निरंतर सुख भोगील. ज्या पुरुषाचे हातानें नित्य सत्कर्म होतात, पाय आतिकोमल खडे अगदीं सोसत नाहींत, तो मनुष्य नानाप्रकारचीं सुखें भोगील.

ज्याचें शिश्न अति लांब त्यास दरिद्रता आणि

ज्याचें मोठें त्यास दुःख. मध्यम असल्यास सुखदायक, ज्याचें आखुड तो पृथ्वी पती होईल.

ज्या प्राण्याची मुत्रधार समोर न जातां उजव्या बाजूस जाईल तो प्राणी राजऐश्वर्यभोगील. आणि लिंग मोठें असून त्याची ग्रंथी तुटली नसून पुढचा भाग रक्तवर्ण असेल तर त्यास पुत्रपौत्रादिकांचें सुख मिळेल. ज्याच्या वीर्यास पुष्पाप्रमाणें सुगंध येईल. तो धार्मिक राजा होईल. मधुसारखा सुगंध सुटेल तोधनवान सुखी होईल.

ज्याच्या वीर्यास मदिरे सारखा वास येतो तो सुखी व स्त्रीविलासी होईल मांस गंध येत असल्यास भोगी होईल. ज्याच्या वीर्यास क्षार गंध येतां तो दरिद्री जाणावा. संगकाळीं ज्याचा त्वरित वीर्यपात होतो तो दीर्घ जिवी समजावा. ज्याची छाती भरदार, समान ऊंच दिसेल तो पुरुष निर्धन असें जाणावें.

स्त्री लक्षण.

ज्या स्त्रीच्या पायाचे कनिष्टांगुलीचे मुळापासून तर्जनी पर्यंत रेखा आहेत, त्या स्त्रीस नवरा चांगला मिळून नवऱ्याचे ठायीं रत असेल तेणेंकरून नवऱ्याची प्रीती तिजवर बसून तीजपासून व्यभीचार होणार नाहीं, ज्या स्त्रीच्या पायाची कनिष्टिकांगुली चालतांना भूमीस लागत नाहीं त्यास्त्रीचा पती तिच्या पूर्वी मरेल, व वैधव्य प्राप्त झालें असतांही जारकर्म करील असें जाणावें. ज्या स्त्रीच्या पायाची तर्जनी अंगुली स

बोंगुली पेक्षां अधिक लांब आहे ती स्त्री लहानपणापासून जारकर्म करील. ज्या स्त्रीचे कुच मांसल असून घट्टरमणीय, ऊर रोम रहित, नाक केवळ चाफ्याचीकळी, मांड्या हस्तीणीचे शुंडा दंडा प्रमाणें ती स्त्री अनेक प्रकारचें सुख भोगणारी होईल.

ज्या कन्येच्या डावे स्तनावर, मानेवर, आणि कानावर काळा तीळ असेल तीस सुलक्षणीं पुत्र होईल आणि सकळ कुटुंबास तिच्यायोगानें सुख होईल. ज्या कन्येची मान अतिशय लांब तिचा स्वभाव क्रूर फारच अखूड असल्यास दरिद्र प्राप्ती, आणि चांगली वाटोळी तीन रेषायु असेल तर तिचा स्वभाव चांगला असून सुख दायक जन्मभर सौभाग्यवती आणि संपत्ती भोगणारी अशी होईल.

ज्या स्त्रीची नाभी खालीं असून उजवे बाजूस असेल व ती वर्तुलाकार असून रोम राहित असेल तर तें उत्तम लक्षण आहे असें समजावें.

ज्या स्त्रीच्या बगलेंत पुष्कळ केंस असतील व कुशीवरही केंस असतील, अथवा स्तनावरही केंस असतील किंवा खालचा ओंठ मोठा असेल तर ती स्त्री विधवाहोईल व तिला स्वामीसुख मिळणार नाहीं.

नाभी गुह्य हीं जर वामभागीं असतील तर, अथवा नाभी व गुह्य हीं लहान असून योनी लांब असेल तर त्या स्त्री पासून वंश वृद्धी न होण्याचें लक्षण आहे.

कोणीहि सामुद्रिक पाहिल्यावांचून कन्या वरूं नये

त्यास काय होतें तें सांगतों. अशी अलक्षणी कंन्या जिचे पोटीं उत्पन्न होते त्या आईस प्रथम मारित्ये नंतर बाप, नंतर भाऊ मारित्ये अशा प्रकारें त्याच्या कुळाचा संव्हार करिते व जो बायको करितो तोपुरुष लग्न होतांच मरण पावतो पाठीमागें दीर असल्यास तोही मरतो. असा एका एकाचा संव्हार करित जाते तेव्हां सामुद्रिक लक्षण पाहून नंतर विवाहास प्रवर्त व्हावें.

रंभा--शुक संवाद.

पूर्वीं गंगातीरीं शुकाचार्य नांवाचे त्रिकालज्ञ ऋषी तपाचरण करीत होते, परंतु तपोबलानें आपलें इंद्रपद हरण करतील या धास्तिमुळें इंद्रानें रंभा नांवाच्या अप्सरेला शुक्र मुनीस योगाभ्यासा पासून पराजित करण्या करितां पाठविली. त्या प्रमाणें रंभेनें रतीस लाज विणारें असें रूप धारण करून गंगातीरीं जाऊन नानाप्रकारें हावभाव दर्शवून भोगदेण्या विषयीं त्याचें मन वळविण्याचा बराच इलाज केला. परंतु मुनिश्रेष्टानीं तिच्या मोहलालित्याला न वळतां तिचें योग्य उत्तरांनीं शांतवन करून, आलीस तशी परत जा, उगीच वल्गना मांडु नको, अशा प्रकारें तिचा पराजय केला त्या वेळीं त्या दोघांचा जो संवाद झाला तो श्रृंगारपर असून पुण्य कारक आहे ह्मणून येथें देतों.

(शा० वि० वृत्त.)

सव्वाशें सरिता[१] धरूनि उदरीं कृष्णासवें जातसे ॥ साठांची गणती करूनि पुरती ती माजि भीमावसे ॥ सव्वाशें सरिता जियेसि भिडती[२] ते तुंगभद्रा मिळे ॥ पन्नासां सरिसी हयग्रिवनदी गर्भी जिच्या मीसळे ॥ १ ॥ वेणा आदिकरूनि साठि तिनशें गंगा मिळाल्या जिला ॥ पूर्वेचा उदधी[३] महासुर नदी देखोनियां कांपला ॥ संकोचे सरिता पती ह्मणउनी केलीं मुखें दोन तीं ॥ पूर्वेच्या उदधीसि विष्णु सरिता कृष्णा मिळे ये रिती ॥ २ ॥ रंभा येउनि वाग्विलास वचनें बोले शुकेंद्राप्रती ॥ संसारा विण या जगत्रयिं नसे आणीक जी सद्गती ॥ ब्रह्मा विष्णु महेश सर्व युवती[४] आधीन कीं वर्तती ॥ माना ही विनती मनांत न धरा संदेह द्यावी रती[५] ॥ ३ ॥ जाणा निर्गुण ब्रम्ह त्यास न गमें माया करी यूवती ॥ दोघांच्या निज संगमें करुनियां हे जाहली उत्पती ॥ येथें मायिक जीव कीं विरमती केवा तयांचा किती ॥ माना ही विनती मनांत न धरा संदेह द्यावी रती ॥ ४ ॥ पक्वानें घृत पाचकेंरुचिकरें गोडी पियूषा[६] परी ॥ तुम्हां लागुनि योजिलीं तरि किजे आरोग्यता जी बरी ॥ भोगा देउनि भोग तांबुल स्वयें देईन मी सन्मिती ॥ माना ही विनती मनांत न धरा संदेह द्यावी

रती ॥ ५ ॥ पर्यंका[७] जडिलें बहू कुसरिनें रत्नां चिया मंदिरीं ॥ आहे शेज वरी अनेक कुसुमें संयुक्त जी साजिरी ॥ तेथें येउनियां सुखें पहुड णें[८] सौख्यासि नाहीं मिती ॥ माना हे विनती मनांत न धरा संदेह द्यावी रती ॥ ६ ॥ संसारीं सुख जाणते तरि कसे योगि तया त्यागिती ॥ सांडोनी निज मंदिरें दरकुटीं कष्टांसि कां भो गिती ॥ टाकूनी गिरिजेसि शंकर तया काशासि गेला वनां ॥ रंभे जाइं उगीच गे लवकरी कां मांडिली वल्गना ॥ ७ ॥ विष्टा मुत्र विशेष जा ण हृदयीं श्लेष्मा[९] मुखीं फारसा ॥ ऐके कश्मल कामिनी ह्मणतसे साक्षात तूं आरसा ॥ नाडी लें बहुतां अनर्थ मुलगे ऐशा तुह्मीं अंगना[१०] ॥ रंभे जाइं उगीच गे लवकरी कां मांडिली वल्ग ना ॥ ८ ॥ रंभा बोलतसे अजी शुकमुनी नारी जशा इतरा ॥ आह्मांलागिं तुह्मीं तसें गणितसां कैसे न योगी श्वरा ॥ त्या पोटीं मळ वाहती वि मळ कीं आह्मींच देवांगना ॥ चीरी त्या उद रा सुगंध धमके विश्वास आणा मनां ॥ ९ ॥ रंभे ऐक ह्मणे तदां शुक मुनी तूं माझिया उत्त रा ॥ पूर्वीं हें कळतें मला हि पुरतें येतों तुझ्या ऊदरा ॥ ऐसें ऐकुनि वाक्य निष्टुर मनीं अत्यं त कोमायली[११] ॥ मी दासी ह्मणवूनि दीन वदनें पादांबुजीं लागली ॥ १० ॥

धारितिल हृदयीं हा प्रेम संवाद साधू ॥ ह्मणउ गुणलवक नि अभिधानीं ग्रंथ हा हेंचि साधू ॥ चरण चिथिले हो वामनें केशवाचे ॥ धरुनि त्तीं श्री हृषी केश वाचे ॥ ११ ॥

चेंडूफळी.

रागेजली माय तया हरीतें ॥ चरित्र ज्याचें हुरितें[१२] हरीतें ॥ मारावया धांवलि कृष्णाजीतें ॥ तों भासला व्रात्य अचाट जीतें ॥१॥ पुरुषयुवति ऐशीदाटली लोकराशी ॥ अनिमिष[१३] नयनानें पाहती श्रीधराशी ॥ मग हळु जननीतें फुंदफुंदोनि सांगे ॥ अमय[१४] निरखिली म्यां चोरटी चौदिसां गे ॥ २ ॥ आह्मीं सर्व मुलें बिदींत अमये चेंडूफळी खेळतां ॥ अभ्रीं उंच उफाळला क्षितितळीं तो येथ आंदोळतां[१५] ॥ तो आला इचिया घरा मग इनें चोरोनियां ठेविला ॥ नेदी मागत मागतां पदरम्यां यालागीं गे गोंविला ॥ ३ ॥ माता म्हणे सुंदर कृष्णजीसी । बोलेच्चना काय वदेलत्यासी ॥ मारावया घे मग फोक[१६] हातीं ॥ समस्तही लोक तदां पहाती ॥ ४ ॥ हरि ह्मणे जरि सोडिल कंचुकी ॥ रितधरीसे पडे न चुकेचकीं व्रजवधू[१७] उचली मग ते घडी ॥ कुचपटांतर चंचल ऊघडी ॥ ५ ॥ वक्षोज गोल अलुमाळ त

मालनील ॥ देखोनि मंद रुदना करिजे सुशील
माता ह्मणे रडसि कां लटकें वदोनी ॥ चेंडूकुठें
निसटला, न कळे उडोनि ॥ ६ ॥ हरि म्हणे अ
मये कमलेक्षणा ॥ जरि निरी उकलील सुलक्षणा
लपविला ह्मणि कंदुक सांपडे ॥ अनृत मी न वदें
धरणी पडे ॥ ७ ॥ तैं ते गोपवधू वधूतवसना सो
डी निरी ग्रंथिका ॥ झाडी वस्त्र पुनः पुन्हा गम
तसे आश्चर्य त्या पांथिका ॥ चेंडू दिव्य पदाहुनी
क्षितितळीं आंदोळितां कौतुकें ॥ देखोनी जन हां
सती खदखदां आले तदां जीतुके ॥ ८ ॥

गोपीगीत. (अनंत कविकृत)

वंदूनियां सद्गुरु पादुकांसी ॥ प्रणम्य भावें मग
सज्जनासीं ॥ श्रीकृष्ण नामेंचि कैवल्य मुक्ती ॥
गोविंद दामोदर माधवेति ॥ १ ॥ प्रभातकाळीं
जननीं यशोदा ॥ उठीं म्हणे सत्वर बा मुकुंदा ॥
गोपाळ येती तुजला वहाती ॥ गोविंद दामोदर
माधवेति ॥ २ ॥ प्रकाश केला गगनीं रवीनें ॥
गोपी दधी त्या घुसळी रवीनें ॥ त्याकंकणाचे
बहु नाद येती ॥ गोविंद० ॥ ३ ॥ प्रक्षाळुनियां
मुख खाय रोटी ॥ लोणी असे सुंदर तूज सा
ठीं ॥ अशी कशीरे तुज झोंप येती ॥ गोविंद
दामो० ॥ ४ ॥ वृंदावना लागुनि जाय बाळा ॥

उशीर माझ्या दळणासि झाला ॥ जेवूनियां गो प घरासि येती ॥ गोविंद दामो ० ॥ ५ ॥ जाई त्वरेनें सखया वनातें ॥ मागून मी धाडिन भोजनातें ॥ गोपाळ हे सर्व तुला वहाती ॥ गोविंद०॥६॥ करांबुजा घेउनियां शुकाला ॥१८॥ अभ्यास गोपी करितीतयाला ॥ रागस्वरें सुंदर बोलवीती ॥ गोविंददा० ॥ ७ ॥ गोदोहना बैसति गोपदारा ॥ पात्रांतरीं वाजति क्षीरधारा ॥ तेणें स्वरें मंजुळ गीत गाती ॥ गोविंद दा० ॥ ८ ॥ गाई वना वांचुनि दीन झाल्या ॥ घरीं नसे रे तृण त्या भुकेल्या ॥ दावीं नवीं तोडुनि धांव घेती ॥ गोविंद० ॥ ९ ॥ वेशीपुढें रे कुळें गोधनांचीं ॥ केलीं उभीं सर्वहि यादवांचीं ॥ गोपाळ हे सर्वतुला वहाती ॥ गोविंद दामो० ॥ १० ॥ घेवोनि जातें दळुं गोधुमांतें ॥ घर्मार्थ बिंदू मुख पंकजातें ॥ सुवक्रकेशा हरिगूण गाती ॥ गोविंद दामो० ॥ ११ ॥ कूपांतरीं घालुनि भांडदोरा ॥ शोभे अती सुंदर गोपदारा ॥ ओढोनि हस्तें श्रम फार होती ॥ गोविंद दामोदरमाध० ॥ १२ ॥ उलूखलीं घालुनि तंदुलांतें ॥ गोपांगना कांडिति रम्य हस्तें ॥ आलापुनी सुंदर गीत गाती ॥ गोविंद० ॥ १३ ॥ पाक क्रिया सारिति गोपबाळी ॥ लाटीतसे सुंदर पूर्णपोळी ॥ घोषार्णवें कंकण ढाळ देती ॥ गोविंद० ॥ १४ ॥ या नंतरें

घेउनियां शिदोरी ॥ नेऊनि देती सखया मुरारी ॥ घे स्वामिया श्रीपति ताट हातीं ॥गोविंद०॥ १५॥ गाईस चारा यमुनेसि पाणी ॥ वळती करावी आजि तुम्हि कोणी ॥ कृष्णासि माझ्या बहु क्लेश होती ॥ गोविंद दामोदर माधवेति ॥ १६ ॥ करीं अती सुंदर मोहरीया ॥ पांवा बहू वाजत थाकथैय्या ॥ ते घोंगडीया कसे ऊडवीती ॥ गोविं० ॥ १७ ॥ लिहून पत्र द्विज पाठवीला ॥ हरी न ये कां बहु वेळ झाला ॥ ऐकोनि गोपी बहुश्रांत होती ॥ गोविंद० ॥ १८ ॥ यादौ हरी लागुनि लुब्ध कैसे ॥ जळांत हे मच्छ सदैव तैसे ॥ समर्थ कैसे हरि गूण गाती ॥ गोविंद दामोदर माधवेति ॥ १९ ॥ गोविंद गोपाळ हे दोघ वंधू ॥ जेवीत होते दहिं भात लिंबू ॥ त्या भोजनाची रुचि फार येती ॥ गोविं० ॥ २० ॥ गोविंद गोविंद हरे मुरारे ॥ गोविंद गोविंद रथांग पाणे ॥ गोविंद गोविंद मुकुंदमूर्ती ॥ गोविंद दामोदर माधवेति ॥ २१ ॥ वृंदावनीं सुंदर वृक्ष आहे ॥ श्रीकृष्ण नामें ध्वनि गर्जताहे ॥ पक्षी कुळें यादव गीत गाती ॥ गोविंद० ॥ २२ ॥ कृष्ण कृष्ण हें मुखारविंदें ॥ घेवोनियां नाचति नाम छंदें ॥ ऐकोनि गाई बहू कान देती ॥ गोविंद० ॥ २३ ॥ कृष्ण कृष्ण हे विचित्र वाणी ॥ हें बोलती वेद महा पुराणीं ॥ हे कृष्ण आनंत

करी विनंती ॥ गोविंद दामोदर माधवेति ॥ २४ ॥
माळाकार परस्परें करगळां घालोनि गोपांगना ॥
गाती नाचति पाहती अवघिया एका जगज्जि
वना ॥ सोन्याचे मणि ओंविले भुजगुणीं गोऱ्या
शिशंकानना ॥ पाचूचें पदकस्थळीं स्मरमना श्री
देवकी नंदना ॥ २५ ॥ ॥ ॥ ॥

कृष्णचरित्र (अनंदतनय कृत.)

सदनिं ठेवुनीं सून एकली ॥ प्रथम यौवना[१८] सुंद
री भली ॥ कलश आपण घेउनी करीं ॥ द्विर
द गामिनी जाय लौकरी ॥ १ ॥ ॥ ॥
खेळे खेळ अनंत लील करुणा सिंधू नटाचे प
री । जैसें पद्म पलाश सद्म न जळीं तद्रूप दावी
परी ॥ ज्याचें हें ब्रिद चोर जार मुकुटोत्तंसा
रुय बिंबा धरा ॥ ज्याची वंद्य कथा तया विन
टल्या त्या गोपबिंबाधरा[१९] ॥ २ ॥ ॥
व्रजपुरीं वधु एक एकदां । रवि सुते प्रति ये
महामदा ॥ चरणिं वाजती भूषणावली । आसित
वाहिनी तीर पावली ॥ ३ ॥ ॥ ॥
गेली मृगांक वदना उदकासि गोपी ॥ तों ये ति
च्या निज ग्रहा हरि विश्वरूपी ॥ धुंडूनिया क
लश भक्षितसे दधीतें ॥ देखे तया त्वरित सून
दयोदधीतें ॥ ४ ॥ ऐसा हरी जो जंव हरी दुग्ध

भारी ॥ आली घरांतुनि तदा घर सून नारी ॥
कृष्णा नव्हे उचित हें करितोसि चोरी ॥ मी
एकली घरिं असे तुज कोण थोरी ॥ ५ ॥ ॥
असासि एकली नीरजानने[२०] ॥ म्हणुनि पातलों
चारुयौवने ॥ वदुनि या परी हस्त कीं धरी ॥
विनवितो तिला आदरें हरी ॥ ६ ॥ ॥
वदोनी असें गोप कांता करानें ॥ घरामाजि
नेली तया श्रीवरानें ॥ पलंगीं बळें नीजवी ह्या
टकाच्या ॥ अशा धन्य लीला जगन्नाटकाच्या ७
अशांत शांत कुंभ पूर्ण घेतला शिरावरी । तयीं कु
चांबरांचला उरोभवेंचि आंवरी ॥ मंद मंद चा
लते नितंब कुंभ गौरवें ॥ ठवितां पद क्षितीस अं
दु बोलती रवें ॥ ८ ॥ ॥ ॥ ॥
जलकलश धराया ऊर्ध्व होतांचि हात ॥ स्तनयु
ग कलशांतें ऊर्ध्व कोडें पहात ॥ उतर उतर मूर्खा
थोर उंचावलासी ॥ मज सम तुं न होसी व्यर्थ
भांबावलासी ॥ ९ ॥ ॥ ॥
आली घरासि युवती[२१] उदकुंभ ठेवी ॥ जीची र
तीस न लभे रुचिरत्व ठेवी ॥ शोधी सुनेसि तं
व ते न दिसे पहातां ॥ ओ दे न ते मग मुली म्ह
णूनी वहातां ॥ १० ॥ अंतःपुरांत निरखी जल
दृष्टि ओघें ॥ तों मंचकीं पहुडलीं दिसताति दो
घें । आहे दुजा कवण अंतरिं ठीक राया ॥ पाहेचि
तों निरखिलें अमरैकराया ॥ ११ ॥ निद्रा दिसे

उभयतां सुरत[२२] श्रमानें ॥ देखोनियां असुख घे स्वकुलाभिमानें ॥ जोडा दिसे सरस यास्तव तोष मानी ॥ दुष्कर्म कीं म्हणुनि राग मनांत मानी ॥ १२ ॥ ॥ ॥ ॥

उभयतांचिया दृष्टि दे मुखीं ॥ जवळि जाउनी ए णिदृङ[२३] मुखी ॥ अधर विद्रुमीं दंत रूतले ॥ दिसति त्यांचियां रंग लोपले ॥ १३ ॥ कचकुचा निरीबंध सुटले ॥ सुमन माळिका व्यूह तूटले ॥ घरम बिंदुचे वृंद दाटले ॥ अवयव भ्रमें एक वाटले ॥ १४ ॥ ॥ ॥ ॥

देखोनि ये रिति तया अति कोप शीला ॥ झालें म्हणे अहह काय करूं अशीला ॥ निःशंक हे रमतसे पर पूरुषातें ॥ सूनें दवावित असे भरूनी रूषातें ॥ १५ ॥ ॥ ॥ ॥

धिगी[२४] ऊठ गे ऊठ नष्टे खटचाळे ॥ तुझे संगतीवंश माझा विटाळे ॥ कसा आणिला बोल माझ्या कुळासी ॥ कसें दाखवूं तोंड या गोकुळासी।१६।

कृष्णा तूं करिसी अशीं गुरुतरें कर्मै कुला नाशकें ऐशा या कलहा गड्या करिसी कां आतां न साहूं शकें ॥ लोकांच्या सुमती मुली तितुकिया केल्या तुवां मोहिता ॥ या तूझ्या करणी समान करणी लोकत्रयीं नाहिता ॥ १७ ॥ ॥

थांब थांब अगुणा घननीळा ॥ सांगतें वृत्त तुझ्या

जननीला ॥ नीज नीज बरवा शिकवीतें ॥ कर्म
हेंच सकळां शिकवी तें ॥ १८ ॥ ॥ ॥
दावूनियां रिति तया अति धार्ष्टिकानें[२५] ॥ आली
गृहांगाणें मग त्वरिता गतीनें ॥ घाली कवाड अ
ति गाढ करार घोषें ॥ लावी कुलूप खिळि बोल
तसे प्रघोषें ॥ १९ ॥ ॥ ॥
कोंडितां यदुवरास गृहांतरीं ॥ वाटला परम
तोष अंतरीं ॥ क्रीडति वधुवरें सुनिकेतनीं ॥ जें
न सौख्य रतिमीनकेतनीं ॥ २० ॥ ॥ ॥
ते पांथिकांतें बहु देत साक्षी ॥ आली यशोदे प्र
ति सारसाक्षी ॥ ह्मणे तुझा पुत्र न मी लवेना ॥
चरित्र त्याचें मज बोलवेना ॥ २१ ॥ ॥
तूं वर्णिसी कृष्ण महागुणाचा ॥ प्रभाव त्या आ
यिक निर्गुणाचा ॥ कीं माझिया आदरुनी सुने
ला ॥ आलिंगुनी गुंतवि वासनेला ॥ २२ ॥
आणावया सलिल[२६] मी यमुना तटासी ॥ जाऊनि
यें तंव विलोकितसें नटासी ॥ आलिंगुनी धरूनि
मत्सुत वल्लभेला ॥ मिथ्या नव्हे धरूनि आणिन
ये सभेला ॥ २३ ॥ ॥ ॥ ॥
नंदही शिकाविना तनुजातें ॥ सद्गुणीं शिकाविना
मन ज्यातें ॥ चित्त हा अर्जुनि कां न वराडी ॥
जाहला परवधूसि बराडी ॥ २४ ॥ ॥
अचाटकर्म हा करी नयेचि सांगतां मला ॥ दि
साच गोप सुंदरी धरीतसे सुकोमला ॥ विचार

ही दिसेचिना वदों मि काय मामिसें ॥ घरोघ
रीं हरी भरे उगाचि नाहिं त्या मिसें ॥ २५ ॥
उगा नसे महानग प्रभाव मी वदों किती ॥ स्व
भाव या प्रपाणिचा समस्त लोक सांगती ॥ क
रीं धरी हरी प्रपंच आपणेंचि संचिता ॥ दुजा
धरी न सांगतो अपाप होय नाचता ॥ २६ ॥ ।
सोसूं किती अगुण हे तुझिया सुताचे ॥ ज्याच्या
बळें बहुत जीव पुरस्थितांचे ॥ चोरी करो मज
न दुःख असे तयाचें ॥ मोडी मुळी म्हणुनि हेंच
मनांत जाचे ॥ २७ ॥ ॥ ॥

लाडका करिसि यास ए तुला ॥ राग ये वदलि
या सये तुला ॥ मूल हें चपळ जाण मीनसें ॥
थे घरा जयिं सुजाण मी नसें ॥ २८ ॥ ॥
तन्वंगीतें धरूनी उभय भुजयुगीं शुद्ध सौख्यासि
सांगे ॥ निद्रा घे पूर्ण चंद्रानन तनय तुझा धीट
मोठा असा गे ॥ हांसे देखोनि मातें झटक उठावि
तां काय सांगू कपाळा ॥ नाहीं हा भीत कांहीं
म्हणुनि जंव वदे तों मिळे लोकपाळा[२७] ॥२९॥
यशोदा म्हणे आयका बायका हो ॥ न देखों
शके हे जगन्नायका[२८] हो ॥ कसें घेतलें हें पहा ढा
ळ मोठें ॥ धरूं पाहते चंड वायूस मोटे ॥ ३० ॥
किती बोल ते बापुड्या या मुलागे ॥ असा बो
ळ याच्या नखाही न लागे ॥ पहा गे कशी कोण

गोष्टी कशाला ॥ निघेना कधीं टाकुनी सब्बशा[२९]
का ॥ ३१ ॥ ॥ ॥
वर्णिती हरि शुचित्व पुराणें ॥ त्यावरी अजिक
र्शी कुफराणें ॥ बोलतें **** वदनाचे ॥ नेणु
नीच गुण चिद्गगनाचे ॥ ३२ ॥ हा म्हणा अगु
ण ही अविचारी ॥ ती खटयाळ कशि पैं न वि
चारी ॥ बोलिया उगलिया नुसत्या या ॥ दावि
सी मुरहरा नसत्या या ॥ ३३ ॥ ॥
ऐशी नंद वधूचिया मुखविधू पासूनि वाक् चंद्रि
का ॥ देखोनी पशुपांगनास्य जलजीं मौनाचिया
मुद्रिका ॥ जों माता करि हास्य लोक पतिची
तों दंत सूर्या शुभा[३०] ॥ लक्षूनी अतिदक्षसी प्रक
टते वाङ्माधुरीभा शुभा ॥ ३४ ॥ ॥
मामी तुह्मी काय भराल रागें ॥ जाणोनियां स
र्व सुतानु रागें ॥ नेणाच कांहीं करणी तयाची ॥
जो गोपिकातें स्मरराग याची ॥ ३५ ॥ ॥
करीं धरुनि सुंदरी करि विलास नानापरी ॥
करी परि सरोवरीं करिणि संगमी श्रीहरि ॥ शि
रे व्रज[३१] घरोघरीं सहित खेळिये शंभरी ॥ हरूनि
दधि घागरी करि रित्या मुलातें भरी ॥ ३६ ॥
दोघांसही सांपडवूनि खाटे ॥ आलयें तुह्मां बोल
खरा न वाटे ॥ प्रत्यक्ष ग्यां कोंडुनियां कवाडें ।
लावूनि आल्यें निरखाल वाडें ॥ ३७ ॥ ॥
दोघांतें धरुनी करीं करि गमा चाले महा संभ्र

में ॥ मागें हांसाति गौळणी हरि पुढें हे घेतलीसे भ्रमें ॥ तों आली सुत घेउनी लगबगां पार्शी य शोदेचिया ॥ मामी यास पहा अहा म्हणतसे चिन्हासही याचिया ॥ ३८ ॥ कांहीं हास्य न आंवरे हरिचिया मातोसि नानापरी ॥ बोले सुंद र डोळसे कवण हा झोंबे तुझ्या कोंपरीं ॥ हा तूझा सुत कृष्ण कीं निरखितां ते न प्रभा सांव ळी ॥ देखे गौर तनू स्वकीय सुत तैं तत्काळ भां बावली ॥ ३९ ॥ ॥ ॥ ॥

टाळी पीटुनि हांसती सकाळिका गोपी तटस्था कि ती ॥ चाकाटूनि[३२] उगीच तन्मय म्हणे श्रीकृष्ण मोठा कृती ॥ चित्तीं चित्त नुरे तनूसि विवरे ढें कूळसेंची विरे ॥ तो आनंदसुत प्रभू विनटला स्त्र वेत्र चिह्नानुरे ॥ ४० ॥ ॥ ॥

बाळ (कृष्ण) क्रीडा.

सवाया

एक दिनीं व्रज गोप नितांबिनि बोलति श्रीह रिच्या जननीतें ॥ कृष्ण घडीभर दे सदना प्रति नेउनि खेळउं यासि सुचित्तें ॥ जाय म्हणे व्रज पाळ वधू निज बाळक जाणुनियां भगवंतें ॥ मी नवजाय कदापि म्हणूनिहि लोळणि घेतालि तथ अनंतें ॥ १ ॥ लोळणि घेतालि देखुनि विस्मय

मानुनि बोलिलि माय यशोदा ॥ बा नवजाय ह्मणोनि तु काय निमित्त असें वदतोसि मुकुंदा ॥ कृष्ण ह्मणे प्रमदा[३३] मज नेउनि आंवळिती हृदयीं मदमंदा ॥ तीक्ष्ण कुचाग्र मला रुतती परि त्यांसि नसे मज वांचुनि धंदा ॥ २ ॥ शून्य घरीं मज नेउनि कोंडिति खेळण मांडिति गोपिका वारी ॥ फेडुनि लुगडीं घालिति फुगडी ऊघडीं काम-गृहें अति गोरीं ॥ दाखविती ह्मणऊनि करीं भयें लोचन झांकुनि दृष्टि मि चोरी ॥ गुदगुल्या करिती मजला मग दुष्ट अशा मज गोवळ पोरी ॥ ३ ॥ खेळति शून्य विऱ्हाडिं वऱ्हाड[३४] करूनि मला नवरा अति आतें ॥ नीजति शेजरिं हरा जवळी परि नीजविती स्व तनू वरि मातें ॥ तेण मुली मज पाडुनिया भुलि हालविती बुळी ही निज हातें ॥ फूगलिते कशि ऊगलि राहिल फुंकिलि आणि जशी मुखवातें ॥ ४ ॥ गोप-नितंबिनि लागिं विटंबुनि सांगे विटंबुनियां जननीतें ॥ गोपि विरामति आयकितां जसि पावाकिं[३५] वीघरती नवनीतें ॥
.... ॥
आणिक काय ह्मणेल ह्मणूनि कितेक भयें मुख झांकिति हातें ॥ ५ ॥ मंजुळ आणि सुमंगळ केवळ आयकुनी निजबालक-वाणी ॥ पातेजतां[३६] तुम्ही

बाळ ह्मणूनि तयांसि वदे व्रजपाळक[३७] राणी ॥
.... ॥
लेंकरूं जाणुनि खेळवितां परि तूमचिं. हीं बहु थोर घराणीं ॥ ६ ॥ याहुनि ही हरि नित्य परो परि भूलवि अंतरीं त्या व्रजनारी ॥ एक त्रुटी जरि देखति हो तरिकोटि युगांहुनि मानिति भारी ॥ कामीनिचा मुख–पद्म वधू व्रज–गोप नितंबिनिचा सुखकारी ॥ कृष्ण मुकुंद रमाधरणी प्रिय वामन मानस–हंस मुरारी ॥ ७ ॥ ॥

राधाविलास.

करुनि नमन देवा बाळरूपा हरीतें ॥ सुरस चरित ज्याचें जें कलीला[३८] हरीतें ॥ कथिन सुरत राधा कृष्ण लीला प्रबंध ॥ तुटति पठण मात्रें सर्व मायीक बंध ॥ १ ॥ ॥ ॥
कोणेकू दिनिं नंद भाज सदनीं ते राधिका सुंदरी ॥ आली सुंदर रूप पाहुनि तिचें थाया बहू घे हरी ॥ राहेना जननी कडेवरि रडे लोळे महा माधवा ॥ कां रे बा उगला न राहसि कसा मंथूं दधी केधवां ॥ २ ॥ ॥
उचलि जननि त्यातें सर्वथा तो न थारे ॥ निजवि फिरवि दावी पांखरांचेहि थारे ॥ शुक[३९] पिक[४०] आणि लावे पारवे हंस मोर ॥ हरि मन

न रमेची चित्र शाळे समोर ॥ ३ ॥ तेंही तयासि न रुचे बहुकोप दावी ॥ त्याची अगम्य करणीं करुणें वदावी ॥ क्रोधें करुनि जननी मग त्यास दापी[४१] ॥ राहे उगा म्हणत तें न मनीं कदापी ॥ ४ ॥ नाना प्रयत्न जननी करितां वळेना ॥ कां आजि बाळ चळला सहसा कळेना ॥ राधे प्रति वदतसे मग नंददारा[४२] ॥ घेऊनि सांत्वन करीं तरि या उदारा ॥ ५ ॥ तियेसि संतोष विशेष जाला ॥ त्वरें करूनी मग त्या अजाला[४३] ॥ कडेवरी घेत धरोनि पाणी[४४] राहे उगा तो मग चक्र-पाणी ॥ ६ ॥ आश्चर्य मानी मग नंददारा ॥ जालें ह्मणे काय कसें उदारा ॥ मातें बहू कष्टविलें खळानें ॥ राधे तुवां शांतविला पळानें ॥ ७ ॥ । ॥

म्हणे राधा मातें उशिर बहु जाला चपळ हा ॥ त्वरें घ्यावा बाई रमण घरिं पेटेल कलहा ॥ वदे ऐसें ठेवी हरि जननि अंकीं आणि निघे ॥ रडे तों आक्रोशें उचलुनि कडेला जननि घे ॥८॥

कृष्ण फार करितो रुदनातें ॥ अंतरीं धरितसो निज नातें ॥ मागुति जननि दे तिजपाशीं ॥ खेळवीं ह्मणतसे व्रज वासी[४५] ॥ ९ ॥ ॥

राधा ह्मणे बहुत एथ उशीर जाला ॥ वाटे मदीय सदनीं निज कांत आला ॥ क्रोधें करू

नि मज ताडिल तो न सोडी ॥ तेव्हां जिणें स
जणि काय तयांत गोडी ॥ १० ॥ ॥
घेवोनियां कृष्ण घरासि जावें ॥ राधे पुतीचें भ
य हें त्यजावें ॥ जेव्हां तुला कांत वदेल रागें ॥
तेव्हां तया एथिल वृत्त सांगे ॥ ११ ॥ ऐसें ति
ला बोधुनि पूत[४६] नारी ॥ दे तीज पार्शी मग
पूतनारी[४७] ॥ मागेल तें दे न करोनि वाणी ॥
माला अशी सांगत तीस वाणी ॥ १२ ॥ या नं
तरें त्वरित घेउनियां उदारा ॥ आली पहा स्व
सदना प्रति गोप दारा ॥ आनंदला हरि मनीं
बहु त्याच काळीं ॥ राधाहि ते पडलि हर्ष म
हा सुकाळीं ॥ १३ ॥ ॥ ॥ ॥
ठेवूनी निज मंचकावरि हरी राधा उभी राहि
ली ॥ नेत्रीं ते मदनास निंदित अशी मूर्ती बरी
पाहिली ॥ तेव्हां ते मद विव्हला निजमनीं
होऊनियां कामिनी ॥ मानी अंतरिं खेद हा सु
ख नसे आणि नव्हे यामिनी[४८] ॥ १४ ॥ देखो
नी तरि बाळरूप हरिचें राधे मनीं काम हा ॥
जालासें कथिलें परंतु सकळां आश्चर्य वाटे महा ॥
अद्यापी शिशु दर्शनीं युवतिला उन्माद कामान
से ॥ राधे अंतरिं हो विकार घडला भावार्थ ऐ
सा असे ॥ १५ ॥ पूर्वीं हे गणिका[४९] असोनि शु
चिंनि कर्णाट देशीं पहा ॥ श्रीरंगीं तरि अर्पुनी
मन सदा केलें व्रतातें महा ॥ स्नानातें करि का

तिंकीं नुगवतां मित्रा[५०] करी पूजना ॥ त्याचें रूप मनांत आणित सदां नेणे दुज्या साधना ॥ १६ ॥
बहुत दिन अशी ते आचरे हो व्रतातें ॥ परम सदयतेनें पाहिलें कामतातें[५१] ॥ ह्मणउनि तिस नेमी स्वर्गता ते उदारा ॥ अमरपुरिंत जाली श्रेष्ठ ते देव दारा ॥ १७ ॥ ॥ ॥
श्रीरंग तीर्थीं करि मज्जनातें ॥ धरी मनीं त्या सह कामना ते ॥ यथाविधी नृत्यहि भाव ना ना ॥ सप्तस्वरें गाय करी तनाना ॥ १८ ॥ ॥
पण्यांगना[५२] पावलि तेथ माना ॥ रंभादिऊर्वाशि तिच्या नसती समाना ॥ इंद्रादि देव गुरु यास्तव रूप लाहो ॥ घेऊनियां स्वमानिं मानवती तिला हो ॥ १९ ॥ ॥ ॥
कोणेके दिनिं सत्यनाथ[५३] सदना येऊनि ते सुंदरी ॥ वीणा वाजवि गाय नर्तन कळा नानापरी आदरी ॥ ऐकोनी मग तोषला निज मनीं मागें ह्मणे हो वरा ॥ तेव्हां ते विनयें वदे त्वरित दे श्रीरंग ऐशा वरा ॥ २० ॥
या नंतरें वदत तीप्रति ब्रह्मदेव ॥ द्वापार-अंत समया प्रति वासुदेव ॥ क्रीडेल नंद-सदनीं शिशु-रूप नारी ॥ तो कीं रमेल तुजशीं प्रिय पूतनारी ॥ २१ ॥ ॥ ॥
त्वरित वर असा ते लाधली हो सुशीला ॥ तदुपरि वृषभानू[५४] योषितेच्या कुशीला ॥ उपजलि

मग राधा नाम ठेवोनि तीला ॥ परम पुनित हो
ते रातली[५५] श्रीपतीला ॥ २२ ॥ ॥ ॥
श्रीमत्केदार-खंडीं सुमुनिसि वदला सूत जो कां
महात्मा ॥ पंचाध्यायीं पहावें चतुर नरवरीं का
र्तिकीच्या महात्मा ॥ ते हो जाणा कथा हे ह्मण
उनि हरिला बाळ-रूपासि पाहे ॥ पूर्वीच्या त्या
अधारें त्वरित हरि करी तीवरी हो कृपा हे २३
यायोगें करूनीच बाळ वपु हे ऐसा असोनी हरी
तीची सुंदर ते तनू निरखुनी कामानळें ते हरी ॥
जीचें रूप रतीस येथ न तुळे दासी गमे मेन
का[५६] ॥ तीच्या वर्णनिं हो पदार्थ जितुका तो
साम्य वर्णूं नका ॥ २४ ॥ ॥
अधर विद्रुम सम्यक रेखिला ॥ दशन हीर समु
च्चय देखिला ॥ परम आतुर होउनि माध
व ॥ सुरत चुंबन इच्छि रमा-धव ॥२५॥ नाकीं
तिच्या मौक्तिक हो सुतेज ॥ कैचें तसें दैत्य-गु
रूस तेज ॥ देखोनि त्यातें मग देव-देव ॥ का
मानळें व्याकुळ वासुदेव ॥ २६ ॥ जळीं मीन
तैसेचि कीं नेत्र तीचे ॥ बरे शोभलें कज्जलें हो
सतीचे ॥ स्मराचेच कीं बाण त्या भ्रूकमाना ॥
हरीच्या मनीं भेदले सत्य जाणा ॥ २७ ॥
कुच तिचे घन वर्तुळ देखिले ॥ मृगमदांकित
सुंदर रेखिलें ॥ निरखुनी मग पाहतसे हरी ॥
करिं धरीन अशी मति तो धरी ॥ २८ ॥

वदन-कमल कैसें शोभताहे सतीचें । विभव क
वण वर्णी यामिनीच्या पतीचें ॥ नयनिं मृग
मुरारी पाहताहे मुखातें ॥ अवनि सकळ जाली
मानि ऐशा सुखातें ॥ २९ ॥ ॥ ॥
जाला हरी बहुत व्याकुळ पंच बाणें[५७] ॥ राधा
हि ते परम विव्हळ त्या प्रमाणें ॥ जाली ह्मणे
युव जरी असता मुरारी ॥ मी लाधतें रति सुखा
सहि आजि भारी ॥ ३० ॥ ॥ ॥
ऐसा वधू हेतु मनीं उभारी ॥ हा भाव जाणोनि
हि कैटभारी ॥ सर्वांतरीं साक्षि असे हरी तो ॥
ते इच्छि लीलाच तशा करीतो ॥ ३१ ॥ ॥
परस्परें हेतुहि एक जाला ॥ या कारणें कीं नट
णें अजाला ॥ सकाम जाला युवही हरी तो ॥
तीच्या स्वयें काम-मदा हरीतो ॥ ३२ ॥
तों देखिलें परम सुंदर रूप तीनें ॥ हें दाविलें
ह्मणत लाघव भापतीनें ॥ सव्रीड होउनि मनीं
उगलीच राहे ॥ त्यानंतरें करित माधव तो त्वरा
हे ॥ ३३ ॥ ॥ ॥
तो मंचकीं धरि करीं कर[५८] सुंदरीचा ॥ झाली
त्वरें तरिहि आदर तो हरीचा ॥ हें काय हो क
रितसां रवि मध्यव्योमीं ॥ जावें जिवें पति गृ
हाप्रति आलिया मी ॥ ३४ ॥ ॥ ॥
हे वागती नगरिंचे नर आणि नारी ॥ एकांति
चें सुरत संगर पूतनारी ॥ हे देखती नयनिं लो

कविवार जेव्हां ॥ त्यां हारिलें हरि पहा स्वकु
ळासि तेव्हां ॥ ३५ ॥ ॥ ॥

सांगे तयासि परि तो न उगा रहात ॥ टाकी
उरोज युगुलावरि दोनि हात ॥ हें उघडें सदन–
द्वार[५९] दिसोनि येतें ॥ राधा म्हणे हरिसि झांकु
नि शीघ्र येतें ॥ ३६ ॥ ॥ ॥

भरंवसा वचनीं हरिला न ये ॥ धरुनि अंचल[६०]
ती सरसाचि ये ॥ अगळ[६१] घालुनियां मग सुं
दरी ॥ हरिस घेउनि ये रति मंदिरीं ॥ ३७ ॥

त्या नंतरें खचित रत्न पलंग सेजे ॥ नानाविधी
रति विलास करितसे जे ॥ तेव्हां तिचे अधर[६२]
चुंबन घे हरी तो ॥ मर्दी कुचांस वसना स्वकरें
हरीतो ॥ ३८ ॥ ॥ ॥

कामालया[६३] युवति झांकितसे करानें ॥ तो
काढिला कर करें कमळाकरानें[६४] ॥ त्यानंतरें
सुरत[६५]कार्य करी हरी तो ॥ राधेचिया सकळ
वृत्ति अशा हरीतो ॥ ३९ ॥पोटीं चतुर्दशहि जो
भुवना धरीतो ॥ हा जन्मला यदु–कुलग्र–मणी
हरी तो ॥ राधेचिया चुचुक–मंडळिं[६६] हस्त ठेवी॥
शंभू[६७] शिरीं कमल शोभत शुभ्र जेंवी ॥ ४० ॥

दंतांबरीं आणि उरोज–युगीं सतीच्या ॥ दंतक्षतें
स्व करजें[६८] समयीं रतीच्या ॥ लागोनि तस हृ
दयीं बहुसाल जाली ॥ खालीं हरीस मग ते स्व
बळेंचि घाली ॥ ४१ ॥ ॥ ॥ ॥

कशी बोलिली राधिका गोप दारा ॥ बहू श्रांत जालेति एथें उदारा ॥ ह्मणोनीच त्यां वैपरित्यें रमावें ॥ न लागेचि एथें तुम्हांला श्रमावें ॥४२॥ तो तिशीं रमतसे अनुरागें ॥ राधिकेसि न वदे अणुरागें ॥ प्रेमयुक्त हरि तो अधराहे ॥ चुंबिते तंव सखी अधरा हे ॥ ४३ ॥ ते वैपरित्य-रति संगार मग्न राधा ॥ जाली परंतु मानिं भावि नि जापराधा ॥ अन्याय आपण हरि स्ववळेंचि केला ॥ या गोष्टिचा सगुण तो नसतां भुकेला ४४ त्यां कासया संगरिं या चुकावें ॥ कांहो तरी आत्मसुखा मुकावें ॥ संताप हा कीं जरि यासि जाला ॥ वंदीन या मी पदपंकजाला[६९] ॥ ४५ ॥ अर्पुनी स्वमन नंदकुमारीं ॥ ते निमग्न वृषभानुकुमारी ॥ माजला रस बहु उभयांत ॥ ये तिचा पति अशा समयांत ॥ ४६ ॥ ॥ ॥

प्रवेशावें गेहीं तंव दिसतसे द्वार दिधलें ॥ उभारा हे शब्दें करुनि महिला[७०] चित्त हरिलें ॥ असे आला द्वारीं रमण हरि या काय करणें ॥ मला ऐसें जालें त्वरित सखया आजि मरणें ॥ ४७ ॥

तदुपरि स्वमनीं कुमुदेक्षणी[७१] ॥ परम विव्हळ होउनि ते क्षणीं ॥ उठतसे मग ते वरिच्या वरी ॥ वसन[७२] कंचुकी[७३] कुंतळ[७४] सांवरी ॥ ४८ ॥ धनि ह्रिदिं[७५] ठेवुनियां कर पंकजा ॥ ह्मणतसे मदना

मज अंत्यजा[७६]॥ छळियलें ह्मणुनी घडिलें असें ॥
पुढिल संकट हें निरसे कसें ॥ ४९ ॥ ॥
अंगीं विराली बहु सारसाक्षी[७७] ॥ तों आठवी
अंतरिं सर्व साक्षी ॥ होता लघू तो युव[७८] पूर्ण
जाला ॥ हें काय अशक्य अधोक्षजाला ॥ ५० ॥
त्यागी शिशुत्वा युव रूप दावी ॥ तो काय हो
पूर्व तनू न दावी ॥ या निश्चया आणुनियां मनातें
प्रार्थीतसे श्रीमधु–सूदनातें ॥ ५१ ॥ ॥
राधा म्हणे हरिस थोर अनर्थ जाला ॥ द्वारीं कृ
तांत सम तो मम कांत आला ॥ हाकारितो उ
घडिं द्वार म्हणोनि मातें ॥ हें काय हो श्रवण
होतनसे तुम्हांतें ॥ ५२ ॥ ॥ ॥
जाला उशीर पति येईल फार रागा ॥ तूं गुंतशी
भ्रमर जेंवि रमे परागा[७९] ॥ हा तो मला निध
न[८०] काळ गमे उदारा ॥ येऊनियां रमण त्या
रुधिलेंचि दारा ॥ ५३ ॥ कां आजि म्यां नंदगृहीं
बसावें ॥ आणोनियां आजि तुम्हां फसावें ॥ हें
काय मी फार वदों कृपाळा ॥ हा बोल माझ्या
चि असे कपाळा ॥ ५४ ॥ ॥
रमण[८१] करिल तूझें काय हो देवदेवा ॥ सबळ
जनक नांदे नंद तो वासुदेवा ॥ झडकरि लघु
व्हावें बाळ लीला धरावी ॥ मजवरि अनुकंपा
हे सुजाणा करावी ॥ ५५ ॥ ॥
मदत हरि सखे तूं सांगसी हो उदारे ॥ परम ग

ह्न कैसें तें गोपदारे ॥ त्यजुनि युवपणातें बाळ होणें सुजाणे ॥ रचित सकळ सृष्टी तोहि धाता न जाणे ॥५६॥ परब्रम्ह तूतें वदे लोक सारा ॥ नसे साच हें व्यर्थ भासे पसारा ॥ असे सूचली गोष्टि तेही वदावी ॥ खरें हें तरी बाळ रूपासि दावी ॥ ५७ ॥ ॥

ऐसें वदोनी मग पादपद्में ॥ वंदी मुनी मानस भृंगसद्में[८२]॥ त्यागीन जी प्राण दया समुद्रा ॥ ह्मणे पडे तों वदनासि मुद्रा ॥५८॥ उर्वी[८३] पडे कोळि जशीच वातें ॥देखोनि ऐसें मग माधवातें॥ आली कृपा त्या मधुकैटभारी ॥ तो आपुली पूर्व तनू उभारी ॥ ५९ ॥ ॥ ॥

त्यानंतरें उठवि येउनि कृष्ण तीला ॥ जाला उशीर वनिते तुझिया पतीला ॥ पाहें ह्मणे मजकडे तरिं चक्र-पाणी ॥ आणीं स्वकांत सदनांत धरोनि पाणी[८४] ॥ ६० ॥ ऐकोनियां वचन हें मग गोपदारा ॥ उत्पाटुनी नयन पाहत त्या उदारा तों रांगतो जवळि बाळ तयाचि काळीं ॥ देखोनियां पडलि हर्ष महा सुकाळीं ॥ ६१ ॥ घेउनी मग कडेसि उदारा ॥ पातली झडकरी गृहद्वारा॥ काढुनी मग तिनें अगळासी[८५] ॥ याह्मणे भितरीं हो गुण-राशी ॥ ६२ ॥ उभा केधवांचा असें द्वार-देशीं ॥ दिसाचेंच तूं काय गे द्वार-देशी ॥असें क्रोध-वाणी वदे कांत तीसीं ॥ वदे आ

दरें सुंदरी ते पतीसीं ॥ ६३ ॥ या सांगतें अर्थ तुम्हांसि सारा ॥ सोडोनिद्या क्रोध महा पसारा ॥ गेलें अजी नंदगृहा उदारा ॥ स्नेहें मला भैसावि नंद–दारा ॥ ६४ ॥ तों ते करी मंथन[८६] नंद–राणी ॥ राधे ह्मणे यासि तुझी शिराणी[८७] ॥ ते व्हां हरी गाढ धरी रवीतो ॥ नानापरी बाळ विवर्तवीतो ॥ ६५ ॥ ॥ ॥ ॥

नेदीच मंथन करूं तिस अब्ज–पाणी ॥ तेव्हां मनीं बहुत हिंपुटि नंद–राणी ॥ आली[८८] ह्मणे उचालिं यासि कडोसि घेई ॥ राधे शिशू समजवीं सदनासि नेई ॥ ६६ ॥ ॥ ॥ ।

त्या नंतरं घेउनि श्रीधराला ॥ आलेंच मी शीघ्र अजी घराला ॥ नाना परी खेळविला न मानी ॥ निजें पुढें घें तइं सौख्य मानी ॥ ६७ ॥ मिथ्या नव्हे गोष्टि अशीच साची ॥ मी ही निजें कृष्ण निजे तसाची ॥ आलेति केव्हां न मने मनासी ॥ निद्रा अशी पापिणि कार्य–नाशी ॥ ६८ ॥ गेहीं न माणूस दुजें उदारा ॥ या कारणें म्यां दिधलेंचि दार ॥ निद्रा भ्रमा गाढ तयींच घाली ॥ स्मृती शरीरांतुनि हो निघाली ॥ ६९ ॥ क्रोधयुक्त रव-गर्जन कानें ॥ ऐकतांचि उठिल्यें दचक्यानें ॥ शंकलें मनिं बहूत उदारा ॥ उघडीं त्वरित येउनि दारा ॥ ७० ॥ हा अर्थ मानुनि मनाचि माजी ॥ सर्वज्ञ हे हो करणें क्षमाजी ॥

ये हास्य ऐशा वचनें पतीला ॥ आलिंगिलें ही ऱ्हदयीं सतीला ॥ ७१ ॥ देखिलें नयनिं नंदकुमारा ॥ बाळरूप तनु सज्जित मारा[९] ॥ पावला पति मनीं सुख-राशी ॥ आणि हो प्रतिदिनीं स्वगृहासी ॥ ७२ ॥ बरें ह्मणे भोजन शीघ्र घाली ॥ कृष्णासि घेवोनि कडे निघाली ॥ त्या नंद सद्मा प्रति गोप जाया ॥ बाई म्हणे घेइं अधोक्षजाया ॥ ७३ ॥ आश्चर्य मानी बहु नंद राणी ॥ राधे अशी काय तुझी शिराणी ॥ म्हणोनि राहे उगला हरी तो ॥ मातें छळी नष्ट परोपरी तो ॥ ७४॥ नेतजा प्रतिदिनीं स्वगृहातें ॥ फावल्या घारिं ह्मणे युवतीतें ॥ ठेवुनी मन हरी पदपद्मीं ॥ राधिका लारतये स्व सु सद्मीं ॥ ७५ ॥ ऐसाहा सुरत विलास वासुदेवें ॥ केलासे निज-जन तारणा सुदैवें ॥ या लागीं परम पवित्र हा सुखाचे ॥ गाती ते प्रियकर होति वामनाचे ॥ ७६ ॥ ॥

रतिमंजरी.

श्रीशंभु चरणीं मन नित्य राहो ॥ माझा प्रणाम गिरिजा पति तूज पावो ॥ आतां प्रसाद करिं तूं मज किंकरातें ॥ त्या नंतरें कथिन या रति मंजरीतें ॥ १ ॥ ॥ ॥

ठेवी पाय पुढें स्वकीयच सदा निचोच्च[१०] भूमीवरी

कांतेला श्रमहो ह्मणी म्हणे तरुपुष्पें स्वहस्तें
हरी[९१] ॥ पर्यंकास[९२] मृगाजिनें करि रती निद्रा
स्वभागें करी ॥ अंतःप्रेम भरालसा प्रियतमा अं
गीं पुरारी[९३] धरी ॥ २ ॥ ॥

रसाळ रस मंजरी प्रकट भानु नामा करी ॥ क
वींद्र धरणी वरी रसिक हर्षवी अंतरी ॥ मनोम
धुर चातुरी करुनि भोगिती अंतुरी[९४] ॥ सुधा[९५]
हि न पवे सरी नवरसें विराजे वरी ॥ ३ ॥ गता
गत कुतूहलें[९६] नयनिंच्या अपांगावरी ॥ स्मितद्यु
ति पडे पतिव्रत वधू सुबिंबाधरी ॥ सुभे परिस
गोड तें वचन कांत कानीं करी ॥ सतीस जरि
कोप ये तरि बुडे तिच्या अंतरीं ॥ ४ ॥

आलें यौवन[९७] कामदेव धरणीपाळें स्वयें धाडि
लें ॥ केलें वास्तुविधान एणनयना गात्रीं बसा
या भलें ॥ डोळां खंजन चातुरी मुखकला सौधा
धरी+माधुरी ॥ वाचातेंहि सुधा समुद्र लहरी ला
वण्य अंगीकरी ॥ ५ ॥ निरांतूनि निघोनि नीर
जमुखी तीरास आली असे ॥ कानीं काय स
रोज[९८] झोंबुनि बसे आकर्ण नेत्रांपुसे ॥ शेवाळां
कुर कां न जाति अजुनी रोमाळि यांसी वळे ॥
श्रोणीभार[९९] न जाणतां घडिघडी बोले बहू भाग
लें ॥ ६ ॥ ॥ ॥ ॥

कुच स्वयंभुहि शंभु तुझा दिसे ॥ परम सुंदर

गौरहि हा असे ॥ कवण धन्य करील नखें तरी शशिकळा बरवी शिव शेखरीं ॥ ७ ॥ ॥
हातीं ही धरिली स्वयें बुझविली शय्येवरी[१००] आणिली ॥ बाळा नीजविली परंतु नवली ती चीं वहिर्देखिली ॥ पारा स्थीर करी धरुनिच करीं जो देख भूमीवरी ॥ तो भोगील परोपरी करुनियां नारी नवी नोवरी॥ । ८ ॥ कांहीं एक निमीलिते क्षणभरी नीरी बरी सांवरी ॥ ऊरुयुग्म[१] बराबरी करुनियां हस्तें कुचांतें धरी ॥ कांताशीं न करीच गोड वचनें निद्रोशिं अंगीकरी ॥ ऐशी भूमिवरी समस्तहि असे विश्रब्ध[२] नारी परी ॥ ९ ॥ ॥ ॥
निद्रा करी न तरि कांत मुखा न पाहे ॥ जागी असे न तरि कामुक भोगिताहे ॥ ऐशी सरोज नयना मनिं चिंतिताहे ॥ निद्रा नये नयानें जागर ही न साहे ॥ १० ॥ ॥ ॥
थानें चोळूनिशानें वदन कमळही आकळीलें पतीनें ॥ कंठीं आलिंगनानें निजवुनि अधरीं चुंबिलें आदरानें[३] ॥ साडी फेडूनि केलें रत[४] तंव हारिलें चित्त सूर्योदयानें ॥ चैलांतानें[५] वधूनें श्रवण सरिसजां झांकियेलें छलानें ॥ ११
नख क्षत उरावरी रदवणासि बिंबाधरी ॥ चळे बकुळ मालिका गलित होय मुक्तावळी ॥ रक्तांत समयीं असें सकळ देखिलें ग्यां सये ॥ नसे स्मृ

ति नसे रती शिकाविलें तुझें तें नये ॥ १२ ॥
भ्रमद्भ्रमर पुंजही दुरिल कुंज तूं सेविला ॥ श्रमें
करुनियां तुला बहुत घर्म हा जाहला ॥ हरीन
नलिनी दळें करुनि मंद मंदानिळें ॥ वदे वचन
गोड तें अमृत जोडल्यानें छळें ॥ १३ ॥ रात्रीं
जागर जाहला तुज असे नेत्रीं मला शोणिमा ॥
तूं प्यालास मधूस तें करितसे माझ्या मनीं विभ्र
मा[६] ॥ भ्राम्य भृंगघनीं निकुंज भवनीं तूं पाव
सी श्रीफळा ॥ मारी मार शरीं करूनि मजला मी
भोगितें त्या फळा ॥१४॥ कांता प्रीति करा मनो
हर वरा तारुण्य भूषा करा ॥ धीरा वीर्य पराक्र
मैक चतुरा स्वामी मला तूं खरा ॥ ऐसें बोलुनि
कामिनी ठिवितसे दृक्पांत कांताननी ॥ स्वासो
च्छ्वास करूनि बाष्प[७] भरलें संपूर्ण चंद्रान
नी ॥ १५ ॥ पर्यंकीं न चढेसि बोलसि न कां पी
यूष वाक्यें मशीं ॥ दृक्पातेंहि सनाथ तूं न करि
सी कोप प्रकाशें कशी ॥ ऐसें केतक गर्भ गौरद
यिते कोपासि संगोपिसी ॥ जे वक्रीं स्मित तें
सखी न करितीं तें सत्य तूं कोपशी ॥ १६ ॥
शशीचे कळे माजि देखोनिशानें ॥ शिवा आपु
लें विंब कोपे त्वरेनें ॥ हराचे शिरीं दूसरी कोण
राहे ॥ करानें हरा भेडसावूनि पाहे ॥ १७ ॥
येतां तल्प समीप कांतललना ते वक्र[८] घोणा[९]
करी ॥ बोले दीनपणें करूनि वचनें तेंव्हां स्मि

त श्रीधरी ॥ हस्तीं हस्त ठिवीतसे तंव पुन्हां कोपास अंगीकरी ॥ नेत्रांतें पसरीतसे पतिवरी रक्तोपलाचेपरी[10] ॥ १८ ॥ एके अंथुरणीं स रोजनयना दोघी निजेल्यावरी ॥ ग्रीवा[11] उच्च करूनि पहात पती तों एकि निद्रा करी ॥ गेला अन्य वधू प्रती मृदुकरें चलांचलातें[12] ध री ॥ केली गुप्त निशा रती तंव वधूते होय जागी बरी ॥ १९ ॥ अंतःकोप कषायित प्रियतमा दे खोनि दोघींवनीं ॥ पुष्पें वेंचावयास योजित अ से एकीस नम्राननीं ॥ अर्धोन्मीलित नेत्र को ण नवलें रामानना पाहतो ॥ स्मेरार्धेऽधर पल्ल वी नववधू आणीक आलिंगितो ॥ २० ॥ धैर्या धैर्य परिग्रहा ग्रह धरा दोघी प्रिया सुंदरा ॥ त्यांला प्रीति करावया पति धरी रत्नासि त्या सादरा ॥ एकीला दिधलें खरें करुनियां नेदी दुजीला खरा ॥ ते झोंबे बहुसाल वल्लभ तिच्या चुंबीत बिंबाधरा ॥ २१ ॥ ॥ ॥

स्मराला सेवाया धरणिवरि रेवा तट वसे ॥ सु गंधाचा वारा मलयज बरा वाहतसे ॥ पहा माहृ ट् धन्या नवजलद विस्तारुन बसे ॥ सखे वां कांहीं ही कारिं मन पराधीनच असे ॥ २२ ॥ सासू कोपतसे सुन्हज्जन तसे जाऊहि निंदीतसे । त्या गेहांत निजेनसें सखि पुन्हां माझे मनींही नसे ॥ मारी मूषक[13] थोर कोण कुहरीं[14] राहो

न ते मांजरी ॥ उत्फालेन करी कढुनि मजला
पीडा शरीरीं करी ॥ २३ ॥ ॥ ॥
तमालतरु दाटती बहुत मालती फूलती. ॥ सुखा
सहुख भोगिती भ्रमरपुंज ही गुंजती ॥ निकुंज
तटिनीतटिं असाति पांथ जा त्यांमती ॥ निदाघ
तपनातपें श्रमति ते तयां सेविती ॥ २४ ॥
घर धणी म्हणतां निज सेवका ॥ त्वरित हा बद
रीद्रुम तोडिका ॥ आइकतां रमणी अति ब्राह्
णी ॥ त्यजि जळांत हिंवांत कुठारिणी ॥ २५ ॥
जें झालें जितकें समस्त तितकें होऊनि गेलें अ
से ॥ जें होईल पुढें पुढें सकळ ही तें होउं देवूं त
सें ॥ जें होतें साक्षि होत (आजि) असतां वी
लंब कां दाविसी ॥ लज्जा सोडुनि बोल गोड
वचनें कां तूं वृथा कोपसी ॥ २६ ॥ ॥
हे मेघ वारिकण वर्षति ना नरांसी ॥ हे शैल
देति तृण नेदिति पूरुषांसी ॥ हा वृक्षही फळ
फळे न फळे जनासी ॥ कैसी विधी पुरविली कु
लटा[15] असोसी[16] ॥ २७ ॥ ॥ ॥
लवंगलतिकादळें झडति चैत्रमासीं बळें ॥ प
रोढत्वानिलानळी करित दुःख तें आगळें ॥ कपो
लतल पांडरें धरिति ताल पत्रापरी ॥ विशेष म
दनानळें जळतसे सदा अंतरीं ॥ २८ ॥ ॥
निद्रा मयूरमिथुनें करिती कपोती ॥ गाती नवी
न तरुपल्लव हालवीती ॥ तैसींच आणिक वनें

किति ही नसेती ॥ खेदासि कां करिसि जा प
ति भोगिं राती ॥ २९ ॥ ॥
रसाळतरुमंजरी धरुनि कृष्ण कानीं वरी ॥ त्वरें
करुनियां वराप्रति पाहतसेसुंदरी ॥ मतमविरहा
नळें नयनिं वाहताती जळें ॥ मनीं म्हणत राधि
का हरि वरील गोपीकुळें ॥ ३० ॥ ॥
जाऊ हीलविलोचनी नणद ते वैराट कानीं
असे ॥ राहे कांत हि गांठणीं तरुणि ते संतोष
मानीतसे ॥ चोळी दाटतसे उरावरि धरी बिंबा
धरीं शोणिमा ॥ साडी नेसुनियां त्वरें करितसे
पांथास कामभ्रमा ॥ ३१ ॥ कांहीं वाकित हार
फार सरळा भ्रू वांकडी हांसते ॥ मांगीं भोंवति
लोचनें भुजि ठिवी कर्णावतंसास ते ॥ अंगोळीस
जडीत घालुनि मुदी कानास कांडोळिते ॥ ऐ
शी ते नृप कन्यका हि दयिताव्याजें[१७] स्वयें
पाहते ॥ ३२ ॥ आला देखुनि अंगणीं बहुधनी
दाता मनीं हर्षली ॥ आलिंगीति परस्परें स्तन
तिचे चोळी उरीं दाटली ॥ आनंदाश्रुजळें त्य
जी घडिघडी धम्मिल्लमाळाछळें ॥ आकर्णांत वि
लोचना पतिपशीं येऊनि वैसे बळें ॥ ३३ ॥
गेलीस तूं कुंज पहावयासी ॥ त्या पापियाच्या
रुदना नसेसी ॥ पलाश पुष्पाभरणें धरीसी ॥
ऐसें वदे कामिनि दूतिकेसी ॥ ३४ ॥ भूषणें
जडित लडनिशानें ॥ धन्य होसि सखि कांत कृ

पेनें ॥ अंतरेल पति रूप पहाया ॥ भूषणें मज न देत धराया ॥ ३५ ॥ लोचनास उपमा कमळाची ॥ दे पती सुवचनास सुधेची ॥ सांग काय करूं यत्न तयाचा ॥ दोष कांत धरि शांतपणाचा ॥ ३६ ॥ स्वेदोदकें करुनि पिच्छल आंग बाई ॥ होउनि कंटकित शोभत ठाइं ठाईं ॥ हा कांत अन्य वधू जे घाडि पाहताहे ॥ कोठें ठिवील पद मान तुझा न साहे ॥ ३७ ॥ चुकोनि तें नाम मुखास आलें ॥ हें सत्य मानी सखि एक बोलें ॥ न मानिसी तें दिव मी करीतों ॥ रोमावळी व्याळ करीं धरीतों ॥ ३८ ॥ कपाळीं पतीचे परस्त्रीपदाचा ॥ पडे डाग देखोनियां यावकाचा ॥ प्रियालोचनप्रांत आरक्त झाले ॥ प्रियाचे मनीं भासती कामभाले ॥ ३९ ॥ चित्ता चंचळता त्यजीं प्रियसखी लज्जे न पीडीं कदां ॥ भ्राते लोचन हो निमेष भगवान् पाहों न दीजे सदा ॥ पिच्छें मूर्धनि पंकजें श्रुतिपुटीं वंशी विराजे करीं ॥ तो दामोदर दृष्टिगोचर असो सर्वज्ञ सर्वांतरीं ॥ ४० ॥ म्यां केली रस मंजरी वरि टिका माधुर्य ईचें पहा ॥ दोषां सर्व करा क्षमा चतुर हो सर्वज्ञ तुम्हीं अहां ॥ ऐसें प्रार्थितसे महा कवि तया कर्णीं करा भूषणें ॥ पूर्णत्वें करिजे दया मजवरी नालोकिजे दूषणें ॥ ४१ ॥

सौंदर्य लहरी.

(सवाया)

वर्णितसें मि यथामति ही हरि सुंदरता तिचिया
कवरीची ॥ चंचल श्यामल कोमल ते हरि निदि
ति धुंधुरता चमरीची ॥ आनन पंक म्हणोनि अ
शंकित बैसलि पंक्ति गमे भ्रमरीची ॥ कीं मुखइं
दुसि दंद म्हणोनि ते आले ति हे तिमिरा च मरी
ची ॥ १ ॥ ॥ ॥ ॥

दंत तिचे विधिनें जइं निर्मिल तैं हि असे हरि
सुंदर हीरा ॥ चंद्रकळाच किं कर्वतिल्या द्विगु
णीत बराबरि लाहन थोरा ॥ तेचि सुधा अधरीं
मधुरी शुभ शोभतसे तो कळंक चकोरा ॥ आस्य
तिचें शुभ हास्य पहा अमवास्येसि लौस्य करी
नच कोरा ॥ २ ॥ ॥ ॥

आननपंकज खंजन कीं तरु तील रुते शिव जीव
विहंगम ॥ लोचन कीं कवि जीव दिवानिशीं शोभ
वि जैवि इडात्रयसंगम ॥ यौवन चाबुकस्वार फि
रावित एकसरें किं विसार तुरंगम ॥ कीं मुखचं
द्र मनोजव हा रथ भोंवइं रश्मिनियुक्त तुरंगम ३
यौवन शैशव रोमसिमेंत वळें उठले कुच पुंड पवावे
त्यांचे शिरींहुनि रेच करूनि हरी वरव्या क्षि
ह्मातिं धरावे ॥ देउनि कौल तुरे शिरपाव वरे मृ

गनाभिमदानें भरावे ॥ पावल अस्त रवी मग म
स्त ते कस्त करूनि ते दस्त करावे ॥ ४ ॥
देखत चारु नितंब तिचा रथ चक्र फिरे शिरिं
धूळि हि घाली ॥ केळि जशा विपरीत तशा तरु
पावले तों कमळें तळिं झालीं ॥ लाजतसे गति दे
खुनियां गज हंस शिके तिजपासुनि चाली ॥
योग्य तुह्मांस हरी भुवन त्रयिं माझे मनास ति
एकचि आली ॥ ५ ॥ ॥ ॥
सांगणें एक तुला मनिचें वद देइनसा मज दे अ
भयंकर ॥ मार[१८] मला अनिवार शरें करिं
मारितसे करुनी मज किंकर ॥ सोडविता रिपु
पासुनियां मज कोण असे तुजवीण भियंकर ॥
मारिल यासि मला जिववील तो भेटवि राधिके
चा कुचशंकर ॥ ६ ॥ ॥ ।
देहलियेवरि देखियले सखि नागमुखीं शशिबिंब
वसे ॥ त्यावरि दाडिम त्यावरि तो द्रुम त्यावरि
कीरकिं चंचु दिसे ॥ त्यावरि चंचल खंजन दो
नच त्यांवरि सुंदर भृंग वसे ॥ त्यांवरि सज्ज श
रासन सायक नायक मानस विंधितसे ॥ ७ ॥
रतिसंगरिं भंगुर हा कचपाश हो यासि तो पाठि
कडे दडणें ॥ वदनें रदना मदनच्छदनामृत देउ
नि भेटि मुखें जडणें ॥ तुळणेस तुझे सुघन स्तन
राधिके यासि नसे दडणें पडणें ॥ झगड्यांत पुढें
भिडणें ह्मणुनी धरियेलिच कंचुकि कीं वडणें ॥८॥

हार धरी जळधार शिरीं घन चंदनपंक विभूति विराजे ॥ श्यामलता वर जे दिसते सखि तोचि गळां गरळाकृति साजे ॥ राधे अबाधित कंठिं उमा प्रतिमा तुझिया कुचशंभुसमा जे ॥ यासि हरी नखचंद्र करी शिरिं देखति गे कईं लोचन माझे ॥ ९ ॥ ॥ ॥

रास क्रीडा. (वामन पंडित कृत)

करुनि नमन गोपीवल्लभा श्रीपतीतें ॥ कथिन चरित त्याचें जें भवातें हरीतें ॥ वरद वर दयेनें दे व्रजीं कामिनींला ॥ मानिं धरि रमणेच्छा देखतां यामिनीला ॥ १ ॥

वेणु तो परिसतां व्रजदारा ॥ चालिल्या त्यजुनि यां गृहदारा ॥ टाकिलीं सकळ ही गृहकामें ॥ व्याकुला परम होउनि कामें ॥ २ ॥

कटीं[१९] शेले शाला कनकमय चोळी मिरविती ॥ शिरीं नेसायाचीं धरिति वसनें दिव्य युवती ॥ पखे वाळ्या नाकीं श्रवणिं झळके नासिक—मणी ॥ हरी तेजें पावे वरि भलतशी तोचि रमणी ॥ ३ ॥

आल्या अशा जवळि ज्या व्रजगोपदारा ॥ देणें असे सुखचि त्यांस तया उदारा ॥ ऐसें असूनि हि विपर्ययताचि दावी ॥ शब्दांत कीं स्वगत भक्ति तई वदावी ॥ ४ ॥

सभाग्या हो येणें मजजवळि हो उत्तम परी ॥
करूं कैसें बोला प्रिय तुमचिया ही तदुपरी ॥ व्र
ज स्वस्थ क्षेम प्रथम मज सांगाच सकळा ॥ क
ळावें कां ऐशा पळत तुह्मि आल्यात विकळा५॥
पहायासि आलों असों काननातें[२०] ॥अहा वाट
लें हें मृगांकाननातें ॥ असें त्यासि वाटे ह्मणूनी
हरी तां ॥ स्वशब्दार्थ दाऊनि चित्तें हरीतो ॥६ ॥
वन असें तुह्मि सुंदर पाहिलें ॥ परि गृहीं गृह
कारण राहिलें ॥ हुडाकिती सुत बंधु पिता पती ॥
तडफडूनि तुह्मांवरि तापती ॥ ७ ॥
ज्या कारणें त्यजिति सर्वहि गोपदारा ॥ तो शत्रु
तुल्य वदतो प्रिय त्या उदारा ॥ सप्रेम कोपसहि
ता पशुपाळ–कांता[२१] ॥हें बोलती पुसुनि नेत्र
जल स्वकांता ॥ ८ ॥
अधरशोणित[२२] पातळ चांगले ॥ खदिर पर्णरसें
अति रंगले ॥ अमृत इच्छुनियां दिन यामिनी ॥
बटाकि होत असों व्रजकामिनी ॥ ९ ॥
अघटित हरि आतां तूज पासूनि जाणें ॥ तदपि क
राणि तूझी आयकावी सुकानें ॥ चळति चरण तू
झ चित्त तें जो हरीतो ॥ निजपद तिकडे ही जी
कडे श्रीहरी तो ॥ १०॥ हे आयकूनि शरणागति
कामिनींची ॥ देखूनि भक्ति मदकुंजरगामिनीं
ची ॥ हांसे दये करुनियां सकळांस पाहे ॥
त्यांशीं रमे करि रमेहुनि[२३] कीं कृपा हे ॥ ११ ॥

दाखवी स्मर[२४] विलास[२५] कळांतें ॥ कोण वर्णिल
तयां सकळांतें ॥ चेतवी[२६] मदन तृप्त करूनी ॥ बाळ
चंद्र करजीं[२७] उकरूनी ॥ १२ ॥
कामाग्नि ये रिति विझोनि रतिप्रसंगें ॥ पेटे पुन्हा
त्वरित माधव विप्र-संगें ॥ क्रीडेंत जे सुरत संभ्रम
भाव दावी ॥ ते काम शास्त्र मति काय विभा व
दावी ॥ १३ ॥ ॥ ॥
खादांकडे घेउनि देव दावी ॥ कामी जनांची ग
ति हे वदावी ॥ कामातुर स्त्री वश ज्या प्रकारें ॥
दावीतसे वृद्ध जनानुकारें ॥ १४ ॥ ॥
न केला मनीं गर्व तों गोपजाया ॥ स्वयें योग्य
झाली असी हे सजाया ॥ तिने ही बहू मानिलें
आपणातें ॥ हरी अंतरे त्या धरी मी पणातें ॥ १५ ॥
म्हणे कृष्ण ॥
भागलें अजि न चालतिपाय ॥ काय यासि कर
तोसि उपाय ॥ पाहिजे जरि असें तुज वाटे ॥ वा
गवूनि तरि ने मजवाटे ॥ १६ ॥ ॥
दे उत्तर प्रभु न होत विलंब ईस ॥ स्कंधावरी
तरि म्हणे हरि येच बैस ॥ देखोनि नम्र उचली
पद सारसाक्षी ॥ तों गुप्त होय प्रभु सार-
असार साक्षी ॥ १७ ॥ ॥ ॥
म्हणे कृष्णा कोठें त्यजुनि अजि गेलास मजला ।
अनर्थाचा हेतू त्वरित मज नाहीं समजला ॥ तु
झी मी तों दासी म्हणि मज उदासीन गमसी ॥
फिरेन श्रीकांता रमत तुजशीं जेवि रमती ॥ १८ ॥

जे ते गोपिस आपणाच जवळी बाटे असावा ह
री ॥ जाणोनी जितुक्या स्त्रिया तितुकिया तत्का
ळ मूर्ती धरी ॥ सोन्याचे माणि इंद्रनीळ तितुके
तो हार त्याचे परी ॥ दों गोपींत मुकुंद कृष्ण
युगुलीं एकेक ते सुंदरी ॥ १९ ॥ ॥
गोप्या गौळिणि सांवळ्या हरितनू रासोत्सवीं
नाचती ॥ श्रीगंगेयमुनेमध्यें तरल ते कल्लोळ आं
दोलती ॥ गोपी लोचन मीन लोल मकर श्रीकुंड
ळें डोलती ॥ गोप स्त्री कुचकुंभ तारक करी पोंहे
रतीचा पती ॥ ५० ॥ ॥ ॥
ऐसा कृष्ण समागमें स्मर-भरें गोपांगना नाच
ल्या ॥ गाती चित्र विचित्र नृत्य करितां कामातु
रा भागल्या ॥ मूर्त श्री पतिच्या समीपचि गळां
तीहीं मिठ्या घातल्या ॥ लक्ष्मी वांछुनियां अ
लभ्य रति ते गोपांगना लाधल्या ॥ २१ ॥ ॥
गांठी कंचुकिच्या[२८] जगद्गुरु करें गोपींचिया सू
टल्या ॥ ग्रंथी चिज्जड त्या अनादि रचिल्या
त्याही अहो तुटल्या ॥ कृष्णाच्या अधरामृतें अ
मरता तात्काळ त्या पावल्या ॥ नीवी-मोक्ष मु
कुंद हस्तकमळें तो मोक्ष त्या लाधल्या ॥ २२ ॥
गोपीतें रतिलाभ देउनि सदां जो ऊर्ध्वरेता[३०] हरी
देखों तत्पति मानिती निजभुजीं आलिंगल्या
सुंदरी ॥ जो लक्ष्मी पति नित्य मुक्त करिती जे

मूढ त्याची खरी ॥ तेतोंडे वणवा पिऊं न ह्मण
ती कां हो तयाचे परी ॥ २३ ॥ ॥
गोपीनाथ कथा हयी सुजन हो घ्या आपुल्या
मना ॥ श्रृंगारामृत हेंचि घ्या त्यजुनियां दुर्वा
सना कामना ॥ त्याही ऊपरि काव्य नाटक लि
पें श्रृंगार जो पाहणे ॥ या श्रीकृष्ण कथामृतीं न
रमणें धिग् धिग् तयाचें जिणें ॥ २४ ॥ ॥
देतां ही विष पावली अमृतता ते राक्षसी पूतना
नीवी मोक्ष अपेक्षितांचि चढल्या वैकुंठ गोपांग
ना ॥ द्वेषें दानव शत्रु दैत्य तरले ऐशा जगज्जी
वना ॥ घ्या ऐसें श्रवणें करुनि न्हृदयीं हे वाम
न-प्रार्थना ॥ २५ ॥ ॥ ॥ ॥

प्रवास.

मार्गशीर्ष सुदिन दिवस आनंदाचा साजणी ॥
शुद्ध नवमी भृगुवासर शुभ मुहूर्त पाहुनी ॥ तुम्हि
प्रवासीं जाण्याचा नेम ठरविला खरा ॥ राजिव
नयन यादवेंद्र सण येवढा घरीं करा ॥ १ ॥ पौ
ष मास मकर संक्रमण ती हो सण सुदी । असा
कसा मुहूर्त तुम्हीं पाहिला हो आधिं मधीं । उता
वेळ कांहो होतां चार दिवस धीर धरा ॥ रा
जि०या० ॥ २ ॥ माघमासिं शिवरात्र घरिं आ
ल्या उत्साहा ॥ शिव मृडानि पूजन करूं जोड्या

नें तुह्मि रहा ॥ घरीं तरी कोण लहान थोर म
नीं आपुले विचारा ॥ राजि० ॥ ३ ॥ सकळ स
णामध्यें श्रेष्ठ आली हुताशनी२० ॥ पंचमीस रंग
करूं वाटत हो माझेमनीं । गृहीं राहुन हेतु माझा
पुरवा सकुमारा ॥ राजि० ॥ ४ ॥ चैत्र मास उ
ष्ण काळ सोसेना तुह्मांला । नाजुक तुह्मीं त्रास
फार होईल जिवाला ॥ रहित करा बेत माझी
काळजी निवारा ॥ राजिव० ॥ ५ ॥ हा वैशाख
मास आपण दूर नका जाऊं ॥ लक्ष जोड झालि
मला थोर नका लाऊं ॥ सोसवेना विवेक
मला ठाउका उदारा ॥ राजिव नयन० ॥ ६ ॥
जेष्ठ मास पुण्य पावन दसहार२१ सन्निध आ
ला ॥ सौभाग्य दायक हें सावित्री व्रत मला ।
लागेना चित्त कुठें जिव प्याला वारा ॥ राजि
व० ॥ ७ ॥ बरसातिचे दिवस आषाढ मास म
आला ॥ अल्प वयस्क स्वामि तुह्मीं दीर्घ प्र
वास योजिला ॥ चालविणें लक्ष माझा स्वा
मि कडेसारा ॥ राजि० ॥ ८ ॥ श्रावणीं
श्रवण देऊन माझी कर जोडुन अर्जी ॥ राह
विलें ह्मणुन नका जाऊं देऊं मर्जी ॥ दृढ नि
श्चय करा आतां नको विचार घारा ॥ रा
जि० ॥ ९ ॥ हरि तालिका झाल्यावर गणनाय
कें गौरी ॥ सहज घडो अनंत व्रत हेतु माझा भा
री ॥ साजणी ग थोर थोर नाहीं चैन जरा

राजि० ॥ १० ॥ आश्विनांत नवरात्र बसविली अंबा ॥ पुजुनि तुष्ट करा कुलस्वामिणी जगदंबा । नवमी कुळधर्म थोर सहज आला दसरा ॥ राजि० ॥ ११ ॥ कार्तिकांत कर जोडून प्रार्थि भीमक बाळी ॥ ह्मणे होनाजी बाळ आतां आलिहो दिपवाळी ॥ नाहीं घडल जाणें आतां कळून आलाहोरा ॥ राजि० ॥ १२ ॥ हा अधिक मास सण पुरुषोत्तम आला ॥ जोड्यानें देऊं वाण वाटत हो मला ॥ फराळाचा बेत सिद्ध करून बागे मधिं चला ॥ राजिव नयन यादवेंद्र सण एवढा घरीं करा ॥ १३ ॥ ॥ ॥

बाल चरित्र.

यादवेंद्र चरितामृत सेवा ॥ लोकहो श्रवण सज्जुनि सेवा ॥ त्या सुखें तुह्मि नमाल जगीं या ॥ भारती अजि यदर्थ मदीया ॥ १ ॥ नानाछंद करी हरी व्रजपुरीं२ बाल स्थिती आदरी ॥ मातेला पदरीं धरी निज करीं मोत्यांचिया झालरी । ज्याचें नाम उमा सदाशिव सदा जो चिंतिती अंतरीं ॥ तो हा कृष्ण विभू जपे जननिची नामावळी साजरी ॥ २ ॥ घरा येतां जातां दधि घुसळितां पाक करितां ॥ पिडे घेतां देतां सहज दुहितां दुग्ध भरितां ॥ नदी पाण्या जातां जन

निरखितां ही परिसतां ॥ फिरे माते मागें पदर धरुनी छंद नसता ॥ ३ ॥ फिरासि कां उगा पाठिसी हरी ॥ सरसिजानना२३ सांग लौकरी ॥ हरि ह्मणे मला घेउनी कडे ॥ स्थिरपणें उगे बैस इकडे ॥ ४ जननि हांसली खदखदां तदा ॥ सकळ काम हें मि करूं कदा ॥ करिसि कां बहू छंद बा उगा ॥ उठ मुलांसवें खेळ जा उगा ॥ ५ जा जा खेळ मुलांसवें मज नको कां जेविसी तें नको ॥ कृष्णा दूध पिसी नको निज घरा बाहेर येसी नको ॥ नारी ह्या तुज नोवऱ्या करिन मी तेव्हां ह्मणेना नको ॥ ६ हूं हूं यशोदे मजलागें तें दे । राधे उरीं कंचुकि माजि तें द ॥ हांसोनि बोले जननी यशोदा ॥ मागों नये रे उगला मुकुंदा ।७ कृष्णा घेउनि कडे निजसद्मा२४ ॥ चालिली नयन–निर्जितपद्मा ॥ हालवी जननी पालख शय्या ॥ सज्जनीं सरस गात जि जो या ॥ ८ ॥ निजेला कीं जागा ह्मणुनि जननी जों निरखिती ॥ दयाब्धीची मूर्ती तंव उघड नेत्रींच दिसती ॥ कशी येना निद्रा तुज गुणसमुद्रा यदुपती ॥ पुन्हा गाऊं लागे तंव वदत देवो मृदुगती ॥ ९ ॥ माते मला झोंप नयेचि कां कीं ॥ तूं काहणी सांगासि पूर्विकां कीं ॥ तेणें गुणें येइल नीज माते ॥ निजेलया या पुरुषोत्तमातें ॥ १० ॥ कृष्ण मूर्ति कितिसुदंर शाहणी ॥ सांगणें ह्मणत पूर्विल काह

णीं ॥ हालवी जननि पालख माउली ॥ ते कथा वदत शीतळ साउली ॥ ११ ॥ होता राम ह्मणो नि हूं क्षितिसुता तत्पत्नि हूं तत्पिता ॥ वाक्यें दंडक हिंडतां दशमुखें ते चोरिली योषिता ॥ निद्रे लागि कथा अशी जननि ते सांगे हरी ऐक तां ॥ दे दे बाण धनुर्धनुष्य अनुजा बोले उठे त त्वतां ॥ १२ ॥ यावें शंकरजी वसा अजि असे दावी कडे धातया[35] ॥ स्कंदा[36] क्षेम सुराधि पा[37] कुशलकीं वित्तेशजी[38] येथ या ॥ ऐसा शब्द निजेलिया हरिचिया माता मुखीं ऐ कुनी ॥ कां कां वोसणसी मुला ह्मणउनी धू धू करी येउनी ॥ १३ ॥ जागें करी जननि त्या गरुडध्वजाला ॥ तो बैसुनी मुदित सावध शीघ्र जाला ॥ पूसी मुखांबु जननी नयनास्त्र धा रीं ॥ दावी असें कपट नाटक सूत्रधारी ॥ १४॥ मी नंदनंदन शिशु व्रज भूमिवासी ॥ हें नाटवे निजहिता नत बांधवासी ॥ कीं मीच राघव अ शी गति दाखवीतो ॥ आनंद नंदन विभू रस चाखवीतो ॥ १५ ॥ ॥ ॥

ह्मावळभट चरित्र.

हरी जगत्रजननी । प्रसूत कंसभूवनी ॥
श्रीकृष्ण जन्मला मनीं । करी जनासि मोहनी ॥ १ ॥

किल्येक बंधमोचनें । तयासि काय बंधनें ॥
करोनि पंथ मोकळा । श्रीकृष्ण जाय गोकुळा ॥ २ ॥
रिपू ह्मणे चला चला । प्रसूतिकाळ पातला ॥
विशेष कंस तो हटी । पदीं धरोनि आपटी ॥ ३ ॥
बळेंचि हस्त पीटिला । तसाचि हस्त निष्टला ॥
ह्मणे रिपु तुझा रिपू । श्रीकृष्ण गोकुळाधिपू ॥ ४ ॥
मनांत कंस खोंचला । उपाय एक सूचला ॥
उपाय कोणता भटो । जिवाचि काळजी तुटो ॥ ५ ॥
वदे भटू नृपापुढें । उकावला चढोवढें ॥
बळेंचि पैज मारितों । तुझा रिपू विदारितों ॥ ६ ॥
बळें बळाविली कळी । कळ्या भट माभळी ॥
उपाध्या कंस हा कुळा । ह्मणोनि वंद्य गोकुळा ॥ ७ ॥
बळें बलाढ्य सूभटू । बळें करोनियां हटू ॥
बसोनियांचि नेहटू । प्रशस्त वाचितो पटू[३९] ॥ ८ ॥
हटें हटेंच उद्धटें । कुटील काळलंपटें ॥
उपायसा प्रयोजिला । मुलासि घात योजिला ॥ ९ ॥
बहू मिळोनि सुंदरी । मुखें ह्मणे हरी हरी ॥
तुह्मांसि वोखटी परी । कुमारहो मुळावरी ॥ १० ॥
बहू मिळोनियां वधू । कराल बाळकावधू ॥
तरीच वंश सावधू । यथार्थ सांगतों विधू ॥ ११ ॥
हळूच कृष्णनाटकें । चरित्र मांडि नेटकें ॥
उगाचि थोर मारका । भटासि बैसला धका ॥ १२ ॥
पदार्थ मात्र चालवी । भटासि पाद्य घालवी ॥
हरीलीळा कळेचिना । अचेतनास चेतना ॥ १३ ॥

सहाण खोड लाटणी । कित्येक खंट पाटणी ॥
इळ्या फळ्या परोपरी । उठावल्या भटावरी १४
पलान तंग तोबरे । लगाम जेरबंद रे ॥
बळाविली कुटाकुटी । भटू बहुत हिंपुटी ॥१५॥
सदेव पाट हालले । समस्त देव चालिले ॥
बळें शुभा धबाविती । कित्येक ठेंकळें भिती १६
भरे मुखांत मृत्तिका । पुरे पुरे नका नका ॥
हरी चरित्र हें भलें । जनीं समस्त शोभलें ।१७।
करील देहदंडणा । हरील जन्म खंडणा ॥
उदास दास तो कवी । बहु जनासि शीकवी १८

रसना स्तुती.

(सवाया.)

पांडव–भाग्य सहस्रमुखासहि वाच्य नव्हे न ध
रे अनुमाना ॥ जें महा थोर पितामह–वैभव त्या
हुनि ही अति उत्तम माना ॥ कोटी चतुर्दश नि
मुनियां विधि पात्र न ज्या पुरुषोत्तम–माना ॥
तो हार. भाइरे भाइ म्हणोनि थापटि पार्थ तुरं
गम माना ॥ १ ॥ हे रसने तुज वीनवितों कर
जोडुनि एक विनंति करीं ॥ सर्व अमान्य जगत्र
य दुर्गुण काढुनि होउं नको अखरी ॥ मौन्य–
रुपें कडु काळ कसा ह्मणसी तरि निश्चळ ध्यान
धरीं ॥ श्रीशिवशंभु दयार्णव केशव माधव कृष्ण

मुकुंद हरी ॥ २ ॥ हे रसने तुज सांगितलें हित काज हरि-स्मरण शिकावें ॥ श्रोत्र-युगीं श्रवणादि करुनि कथामृतसार मनांत धरावें ॥ हस्तांकिं पूजन मस्तकिं वंदन नेत्रिं विलोकुन रूप भरावें ॥ ईश्वर हे समबुद्धि निरखुनि मानुं नको मग आप परावें ॥ ३ ॥ ॥ ॥ ॥

पार्थ भाग्य.

कुचयुगुलिं रमेच्या जो रतीं हस्त नाचे ॥ परि हरि नख-चंद्रीं कामदाह स्तनाचे ॥ हय निवविहरी तो त्या करें स्यंदनाचे ॥ जळधिति समरीं त्या पांडुच्या नंदनाचे ॥ १ ॥ श्री-रमा-कुचयुगीं कर ज्याचे ॥ बाळचंद्र करिती कर ज्याचे ॥ त्या करें करुनि अर्जुन-वाजी ॥ खाजवी करुनि नित्य नवाजी ॥ २ ॥ शास्ता हरी जो जळजासनाचा ॥ तो अर्जुनाच्या हयशासनाचा ॥ चाबूक माथांच तुरा करीतो ॥ धूतां हया चौं चतुरां करीं तो ॥ ३ ॥ रुतति दंत रतीं कमळाऽधरीं तुरग रश्मि तया दशनीं धरी ॥ चहुं हयांसि धुतां स्व चहूं करी ॥ परम कौतुक हें समरीं करी ॥ ४ ॥ जो जीव योजी जड जंगमातें ॥ जो निर्मितो चिज्जड-संग मातें ॥ अर्पी रमा ज्यास सुरंग माळा ॥ तो जुंपितो पार्थ तुरंगमाला ॥ ५ ॥

योजितो हय-गळां गळसूत्रें ॥ जो रमेसि वरि मंगळसूत्रें ॥ त्या करें करुनि माधव दोरे ॥ पार्थ भाग्य किति काय वदों रे ॥ ६ ॥ रमेच्या रतीं स्वेद शिंपूनि पाणी ॥ जळीं क्रीडती तो हरी-चक्रपाणी ॥ हयांचे मुखीं लाळ हाणोनि वारी ॥ रणीं सारथी अर्जुनाचा निवारी ॥ ७ ॥ तपें विधीला उपदेश हो हो ॥ परंतु जो पार्थ-हयांस हो? हो? ॥ म्हणे मुखीं त्या मधुकैट भारी ॥ आश्चर्य हें मानिति देव भारी ॥ ८ ॥ शिरीं हरीचा पद-रेणु ज्याच्या ॥ न संपदा तो गणि अब्ज जाच्या ॥ देतां धुरीं अश्व-खुरीं उडावी ते धूलि माथांवरि हो पडावी ॥ ९ ॥ धरी हातें हारे कर ललित चाबूक दस रे ॥ मुखें होरे? होरे म्हणुनि हय ते नाचवि बरे ॥ पहारे पाहारे म्हणति जिकडे तो रथ फिरे ॥ न कोणी सामोरे सरित मनि दुर्योधन झुरे ॥ १० ॥ ॥ ॥

जल-क्रीडा.

नमन करुनि आधीं सद्गुरु श्रीहरीतें ॥ कथिन चरित गोपी गर्व-वारी हरी तें ॥ कळवि भजन ऐसें तें भवाब्धींत तारी ॥ पशुप-वधु-जनातें त्या कालिंदींत तारी ॥ १ ॥ ॥ ॥

स्वजन ही जरि गर्व मनीं धरी ॥ तरिच मित्रपणें
हरि तो हरी ॥ उचलितां गिरि गोप बळें बळें ॥
कळवि त्यांस हरीच बळें बळें ॥ २ ॥ ॥

वधू नीरा जातां हरि तिस हरी जाणुनि मनीं ॥
पहातां गर्वातें सकळ त्याजिला खळ तमनी ॥
नदीमध्यें नौकेवरि निज कुळीं स्वामि सरिता ॥
निगर्वा ह्या सख्या करुनि मग तो तारि वनिता ३
नीरानिमित्त यमुनेप्रति गोप-नारी ॥ जातां सर्व
कडेस घेउनि पूतनारी ॥ नेला तिहीं न कळतां
जननीस जेव्हां ॥ केलें विचित्र हरीनें यमनेंत
तेव्हां ॥ ४ ॥ पावल्या जंव वधू यमुना-तिरीं ॥
नाव देखिलि तिहीं बरवी निरीं ॥ इच्छिती वरि
बसोनि फिरावया ॥ यत्न कांहिं न चलेचि ध-
रावया ॥ ५ ॥ सांपडेल कसि नाव बसावया ॥
यत्न त्या पुसति विश्व-विसावया ॥ कृष्ण बोलत
असें कि मूढ हो ॥ अर्भकासि भलता पुसतां हो ६
आज्ञानव वधूंस दावि पर तो सर्वज्ञ त्याच्या
मनीं ॥ आहे तें करणें परंतु वर तो बालत्व भावी
जनीं ॥ चित्तीं तैसेंचि तो ही धरुनि मग तो कृ-
ष्ण नावेस लक्षी ॥ ऐसें देखोनि तेव्हां स्वमानिं
सकळा हर्षल्या त्या मृगाक्षी ॥ ७ ॥ ॥
कळुनि व्रज वधूंसी स्वामिचा स्नेह भारी ॥ तारि
त मरुत-नेटें चालवी नाव तीरीं ॥ चढति उडति

नौकेमाजि घेऊनि कृष्णा ॥ न कळत जल मध्यें न्यावया फार तृष्णा ॥ ८ ॥ ॥ ॥
नेती नाव पुढां पुढां जरि हरी वारी जळा भीउनी ॥ जाणों कीं फिरावयास ह्मणती आणूं तिरीं नेउनी ॥ आज्ञाभंग वधूंसिं संग करितां तेणें हरी कोपला ॥ क्रीडेमाजि अनर्थ थोर यमुने माझारि आरंभिला ॥ ९ ॥ सच्छिद्रनौका जळ आंत चाले ॥ प्रचंड वातें बुडवूं सकेलें ॥ तों त्या जळा हाणिति पाद–घातें ॥ आणूं पहाती तिरिं नाव हातें ॥ १० ॥ ॥ ॥ ॥
निघत सलिल नौके माजि अर्द्धास आलें ॥ वधुंसि काटसि कृष्णा कंठपर्यंत झालें ॥ म्हणति वधु बरें कीं आधिं गे आह्मि मेल्या ॥ सगुण मरण भेणें स्कंधिं वाहूं निमाल्या ॥ ११ ॥ ॥
वधूंसही कंठ पर्यंत आलें ॥ तें देखुनी कृष्ण वधूंस बोले ॥ कां आणिलें गे मज एथ मारूं ॥ या संकटीं कोण शकेल तारूं ॥ १२ ॥ एक मी तुह्मी उदंड धरावया ॥ बांधल्याच न सुटो चपळा या ॥ मारि त्या जरि थडीसचि मातें ॥ सांग त्या कवण जाऊनि माते ॥ १३ ॥ जळत यावरि तेल पडे जसें । परम दुःख वधूंस घडे तसें ॥ न वदवे परि प्रार्थिति बायका ॥ ह्मणति राखें वधू यदु–नायका ॥ १४ ॥ नौका जुनी न दिहि पूर्ण जल–प्रवाहीं ॥ आह्मी मुढा सकळ

व्यर्थ अनर्थ पाहीं ॥ विश्वास मूळ इतुकाचि व्र जांगनांसी ॥ कीं कर्णधार दुसरा हरि तूंच होसी ॥ १५ ॥ ॥ ॥ ॥
केल्याही अपराध थोर न मनीं तूं तों जगाचा धनीं ॥ नोपेक्षीं शरणागता समूळ तो सांग उपाया धनी ॥ लावा कंचुकि नावर तरि चिर फेडूनि वस्त्रें भरा ॥ तों त्या लाजति हांसती म्हणति गे हा जार पूरा खरा ॥ १६ ॥ परंतु त्यांत्या मनिं साच वाटे ॥ लाऊं सखी कंचुकि नीर-वाटे ॥ त्या उत्तरा बोलति या उपायें ॥ आहे उरीं अंचल लाज काये ॥ १७ ॥ मग उरीं दृढ अंचल ओढुनी ॥ त्वरित लाविती कंचुकि सोडुनी ॥ नावरेच जळ आंवरत्यास त्या ॥ प्रार्थिती शरण येउनि त्या सत्या ॥ १८ ॥ अशा जरी प्रार्थिति गोप-नारी ॥ वस्त्रेंहि सोडा म्हणती मुरारी ॥ त्या लाजुनी राहति जों फिरोनी ॥ तों दाटली नाव जळें भरोनी ॥ १९ ॥ बोलती सकळ नंद-नंदना ॥ या नदींत जरि तारिसि अंगना ॥ मोल पांच कवड्या अथवा सा ॥ सोडवीसिल कसा वधु-वासा ॥ २० ॥ विद्युल्लता तडतडी घन वर्षताहे ॥ आंधार थोर रजनी सम भासताहे ॥ नौकाहि ते डळमळी पवन-प्रचंडें ॥ एकीस एक वधु थांबळी बाहु दंडें ॥ २१ ॥ असा मांडला थोर अकांत जेव्हां ॥ तशा त्यातिनी

वस्त्र सोडूनि तेव्हां ॥ सखी वांचल्या लाज लौकीक वाहूं ॥ जिवें वेंचल्या कृष्ण कोठूनि पाहूं ॥ २२ ॥ नाव-रंध्रिं शिरुनी मग अंबरा ॥ राहिल्यां वधु निरांत दिगंबरा ॥ हरिस तारिल आस सत्यांस ते ॥ टाकिली तनु समंधिक आस ते ॥ २३ ॥ ॥ ॥ ॥ ॥

प्रकृति पर पहातां योनि आहे मतीनें ॥ वसनरहित कांता कां करी हेमतीनें ॥ हरि-भजनिं मनींची टाकिजे लाज लोकीं ॥ तरि हरि-पदिं जाती धन्य ते या त्रिलोकीं ॥ २४ ॥ आपापुला देव स्मरोंचि सांगे ॥ वाटे तयां कीं हरि हीत सांगे ॥ तो जाणवी कीं धणि ज्यासि मारी ॥ त्यातें बळें किंकर काय तारी ॥ २५ न कळतां हरि हार्द सत्या सत्या ॥ चिंतिती स्वकुल दैवतास त्या ॥ भाव आधिंच तया वरि ज्यांचा ॥ त्यांत सत्य ह्मणती हरि-वाचा ॥ २६ ॥ न पवती सुर कोणाहि तेधवां ॥ पुढति पाहती सुंदरि माधवा ॥ मग तया सकळां कळलें असें ॥ चरित हें अवघें हरिचें असे ॥ २७ ॥ ॥ ॥

नियंता विश्वाचा हरिच मति यां सत्य कळलें ॥ कळों आलें ऐसें स्वसुर सुर-सामर्थ्य न चले ॥ पिता माता भ्राता हरिच अवघा सर्व कळुनी ॥ तया लागीं आल्या शरण सकळा गर्व गळुनी ॥ २८ जननिसीं धरि बाळ दटाविल्या ॥ वधु तशा ह

रिनें मग मानिल्या ॥ नयन झांकावे त्यां करवीं च त्या ॥ करुनि कौतुक दाखवि त्या सयां ॥ २९ ॥ ॥ ॥ ॥

नसे नांव वारा न पर्जन्य-धारा ॥ नसे नीर तीरीं उभ्या सर्व दारा ॥ तशीं दीधलीं शुष्क वस्त्रें अनंतें ॥ जशीं घेतलीं नाव-रंध्रें अनंतें ॥ ३० ॥

पहाती जों तीरीं वधु उघडुनी नेत्र सकळा ॥ दिसे त्यां स्वभावें परि मानिं सुविस्मीत निकळा कळों आलें कीं हा हरिच करितो खेळ अवघे ॥ स्फूनी कृष्णाचीं नमिति पद-पद्मींचि निरघें ॥ ३१ ॥

म्हणति सकळ माया हे तुझी देव राया ॥ न कळत नर तूतें मानितों मंद जाया ॥ तराति भव-समुद्रीं चिंतिल्या भक्त तूतें ॥ निज-जन-बंधु-रक्षीं हे नदी काय तूतें ॥ ३२ ॥ ॥

कळोनियां ब्रह्म असें स्वभावें ॥ आलिंगिती मोहूनियां स्वभावें ॥ नाना परी खेळतसे स्वभावें ॥ ध्याती मनीं वामन त्यास भावें ॥ ३३ ॥ ॥

राधाकृष्ण विनोद.

गोविंदा गोपाळा कृष्णा विष्णू मुकुंद घननीळा ॥ धृतकौस्तुभवनमाळा पीतांबर धारि देवकी बाळा ॥ १ ॥

कोणी एके दिवशीं रतिसुख देऊनि सत्यभामे

ला ॥ गेला तो राधेच्या सदनीं जो कां बहूत
थामेला ॥ २ ॥ ॥ ॥ ॥
राधा प्रितीनें पुसते हरीसी ॥ आरक्त ते लोचन
कां तुम्हासी ॥ कोणे स्त्रियेशीं रतिसंग केला ॥
मुखीं असे पिंगट वर्ण आला ॥ ३ ॥ ॥
श्वास मुखीं नखनखमुख क्षतचिन्हें पाहिलीं तिणें
सकळ । नकळत मज सवतीशीं रतला म्हणऊनि
जाहली विकळ ॥ ४ ॥ ॥ ॥
पडतां विकळ सकळ गुणसंपन्न हरी म्हणे अहो
राधा ॥ आतां सांग सखे मज कैशी इतुक्यांत
जाहली बाधा ॥ ५ ॥ ॥ ॥
चिरा मस्तकींचा कसा चोळलासें ॥ विचारें
कधीं पेंच कां मोकळासे ॥ सुगंधादिकीं केशते सि
क्त होती ॥ बहूवेळ तूं कुठें गुंतलासी ॥ ६ ॥
करितीस कलह कां तूं कथितों मी एक धरूनि
विश्वास ॥ होतांचि स्मृति धांवत आलों म्हणऊ
नि दाटला श्वास ॥ ७ ॥ ॥ ॥
कोठें गेलां होतां माधवजी घर्म कांवि अंगाला ॥
सांगा लाज नका धरूं पाहोंच्या काय लागलें
गाला ॥ ८ ॥ ॥ ॥
वनीं पोंवळी गाय माझी पळाली ॥ तिये लागिं
आणावया रात्र झाली ॥ अशा जागरणें नेत्र आ
रक्त झाले ॥ मुखीं तेज नाहीं असे कष्ट केले ॥ ९ ॥
गाई चारित उष्णीं फिरलों म्हणऊनि घर्म अंगा

ला ॥ कस्तूरी तिलकातें लावीतां हात लागला
माला ॥ १० ॥ ॥ ॥

मग ती दिभुलागिं पुसे तुमची विपरीत संगमी च
र्या ॥ मर्यादेची मजहुनि कोण मिळाली तुह्मांस
यदुवर्या ॥ ११ ॥ ॥ ॥

मध्यान्हीं अति गंधि तीं सुमनसें आणावया पा
तलों ॥ आकाशीं घन दाटले म्हणउनी जाई त
ळीं बैसलों ॥ पुष्पांचे रसबिंदु जाण पडले तेणें
सुगंधू सये ॥ पागोटें जरि गुंतलें तरुवरी हें टा
ऊकें ही नव्हे ॥ १२ ॥ ॥ ॥

ओष्ठीं दिसें अंजन कां तुह्मासी ॥ ठसावलें कंक
ण पृष्टिकेसी ॥ वक्षस्थळीं माळहि रूतलीसे ॥
अशा विनोदें हरिलागिं पूसे ॥ १३ ॥ ॥

वनीं जांबुळें भक्षिलीं येत येतां ॥ दिसे ओष्ठ
काळा सखे तूज आतां ॥ अकस्मात येतां तुझे मं
दिरासी ॥ तुझें द्वार गे लागलें पृष्टिकेसी ॥ १४ ॥
माझें दुर्दैव ऐसें ह्मणउनि तुज गोष्ट हे बरी
सुचली ॥ जारा चोरा घरच्या चोरा तुज सांग
कोणती रुचली ॥ १५ ॥ ॥ ॥

घरीं गाय वत्सें असे मोकळीं गे ॥ तयाचें ल
घू शृंग तें लागलें गे ॥ अशीं उत्तरें देत तो राधि
केसीं ॥ पुरे बोलणें कृष्णजी तूज पाशीं ॥ १६ ॥

संतती मुकी बहिरी होण्याचीं लक्षणें.

पार्वती पुसते.

(ओव्या.)

काळे सांवळे कोणे गुणें ॥ गोरे जन्मले कोणा पासून ॥ मुके बहिरे कोण्यागुणें ॥ पांगुळे कोणा पासून झाले ॥ १ ॥ कुजें कुरें कांबुरें ॥ हें कोण्यागुणें साचार ॥ आळशी जन्मले निर्धार ॥ हें कोणापासून तें सांगा ॥ २ ॥ कन्या पुत्र एक बीजें ॥ नपुंसक जन्मले कैसेंवोजें ॥ आतां शंकरें एवढें गुज ॥ मज सांगोनि द्यावें ॥ ३ ॥ एक काळा एक गोरा ॥ स्वामी उघडावें गौरवा ॥ एवढें सांकडें सदाशिवा ॥ दूर करावें जी ॥ ४ ॥ सवाशें वर्षांची हयात ॥ एक जाती शंभर नव्वद होत ॥ एक ऐंशीं सत्तर साठ पंधरा सात ॥ चाळीस वीस तीस दहा वर्षांत जीवें जाती ॥ ५

शंकर सांगतात.

ऋतु देतों वा सुंदरी ॥ शंका मनीं वाहे सर्व शरीरीं ॥ तेथें नपुंसक सुंदरी येणाचि गुणें ॥ ६ ॥ पुरुषाचें रेत उणें एक रजें ॥ तेथें कन्या जन्मली वोजें ॥ शंकर सांगे गौरीस गुज ॥ सिद्धांत मान तूं ॥ ७ ॥ पुरुष उठे रेत देउनी ॥ स्त्री निजे जरी उताणी ॥ तेथें बाळक जन्मती दोन्ही ॥ ति

च्या पिंडांत ॥ ८ ॥ सत्व गुणें रमत हर्षाचारें ॥
तेथें बाळक जन्मे गोरें ॥ तमो गुणें रमत अहंकारें ॥
तेणें लेंकरूं काळें जाण ॥ ९ ॥ रजो गुणें रमती
साचारें ॥ तेथें सांवळीं होती लेंकुरें ॥ ऋतु देतां
चंचळ घाबरें ॥ तेथें वेडें कांपरें जाण ॥ १० ॥
एक रमती धरूनि अबोला ॥ तेथें मुका गर्भ जा
हला ॥ शंकर सांगे गौरीला ॥ एक सावधप
णें ॥ ११ ॥ एक रमती झांकूनि डोळे ॥ तें ग
र्भींच झालें आंधळें ॥ ऐसें सांगीतलें जाश्वनीळें ॥
गौरीप्रती ॥ १२ ॥ एक रमती घूर्मीत निजसुरें
तेथें होती बहिरे ॥ ऐसें सांगीतलें शंकरें ॥ दुर्गे
लागुनी ॥ १३ ॥ एक रमती कपाळा गांठी ॥
तेथें जन्मे नकटे ॥ दहा हाडें कपाळीं लल्लाटीं ॥
ऐसें जाण सत्य पैं ॥ १४ ॥ गर्भिणी असतां हिं
डे घरोघरीं ॥ होती तेथें पांगुळे निर्धारीं ॥ पाल
व आलिया मैथुन करी ॥ तेथें रक्तपिती जा
ण ॥ १५ ॥ ॥ ॥

कोणत्या तासीं ऋतु दिधला असतां आयुष्य किती.

पहिले तासीं दिधला ऋतु ॥ तरी ऐकावें सावध
चित्त ॥ तेणें सत्त्यारों वर्षं हयात ॥ पुरुषालागो
नी ॥ १ ॥ दुसरे तासीं घडे मैथुन ॥ तेणें शंभर

वर्षें पूर्ण ॥ आपण जगज्जीवन ॥ वदता जाह ला ॥ २ ॥ तिसरे तासीं मैथुन करी ॥ तेथें न व्वद वर्षे निर्धारीं ॥ शंकर ह्मणे वो गौरी ॥ चि त्त देयीं माझ्या बोला ॥ ३ ॥ चौथे तासीं अ नायासें मिळती ॥ तेथें हयात ऐंशीं वर्षे होती ॥ शंकर ह्मणे गौरी प्रती ॥ एकचित्तें परिसिजे ॥ ४ ॥ ऋतु दिधला पांचवे तासीं ॥ सत्तर वर्षें हयात त्यासीं ॥ सहावे तासीं निश्चयेसीं ॥ तेथें साठ व र्षे पैं ॥ ५ ॥ सातवे तासीं दोघें मिळती ॥ पन्ना स वर्षें तयां प्रती ॥ शंकर सांगे गौरी प्रती ॥ एक चित्त करूनी परिसिजे ॥ ६ ॥ आठवे तासाची गणती ॥ चाळीस वर्षे निश्चिती ॥ पूर्ण होतांची निश्चिती ॥ मरण जाण सत्य पैं ॥ ७ ॥ ऋतु दिधला नव्वे तासीं ॥ तेथें तीस वर्षें निश्चयेसीं ॥ शंकर सांगे गिरजेसीं ॥ सत्य वचन पैं ॥ ८ ॥ दहावे तासीं जाण ॥ तेथें वीस वर्षे निधान ॥ अ करावे तासीं मैथुन ॥ प्राणी दहा वर्षांनीं मरे ॥ ९ ॥ बारावे तासीं ऋतु दिधला ॥ तेथें दहा वर्षे आ युष्य त्याला ॥ एक उपजतांचि मेला ॥ नाहीं सुख दुःख ॥ १० ॥

कोणत्या वारीं न्हाण आलें असतां फल.

प्रथम न्हाण आलें तो दिवस आदितवार ॥ तरी

ती विधवा होईल नार ॥ प्रथम न्हाण आलें तो
दिवस सोमवार ॥ तरी ती वांझ नार जाणावी । १ ।
प्रथम न्हाण आलें तो दिवस मंगळवार. ॥ ती
होय अखंड वांझ नार ॥ प्रथम न्हाण आलें तो
दिवस बुधवार ॥ तीस कन्या फार होतील
पैं ॥ २ ॥ गुरुवारीचें फळ ऐक ॥ तीस होतील
उदंड लेंक ॥ ह्मणोनी शंकर सांगे विवेक ॥ तें
कळलें गिरिजे मती ॥ प्रथम न्हाण आलें शुक्र
वारीं ॥ त्यावरीं होती कन्याकुमरी ॥ शंकर ह्म
णेवो गौरी ॥ ऐक चित्त देउन ॥ ४ ॥ शनवारीं
चें ऐक फळ ॥ ती नार मोठी छिनाल ॥ भ्र
तार असोनियां जवळ ॥ चित्त ठेवी पर पुरुषाव
री ॥ ५ ॥ आतां राहो ही कथा ॥ सां
गेन ऐक कर्मकथा ॥ स्वस्थ करूनियां चित्ता
ऐकिजे पां ॥ ६ ॥ ज्याणें साधू निंदा के
ली ॥ त्याची गर्भी वाचा गेली ॥ ज्याणें लट
कीच गोवाही दीधली ॥ तो थोटा होउनी आला
जन्मांसी ॥ ७ ॥ ज्याणें गोत्र हत्या केली परिये
सी ॥ तो घाण्याचा बैल होय ॥ ८ ॥ दोन्ही नेत्र
बांधिती ॥ भोंवते गरगरां फिरविती ॥ एकावरी
जाळ घालिती ॥ ते गोण्यावाहती बैल जाण ९
एकाचें द्रव्य घेऊन बुडविती ॥ ते श्वान होऊनि
येती ॥ फेडावया तया घराप्रती ॥ सत्य सत्य
जाणपां ॥ १० ॥ एक लग्न करोनी स्त्रीस सांडि

ती ॥ तो फिरे देशावरामती ॥ लागती तिडक्या त्यामती ॥ वांयां व्यर्थ चडफडती ॥ ११ ॥ ज्याणें स्त्री हत्या केली ॥ त्यातें बोकडाचे जन्मासी घाली ॥ मुकीं जनावरें मारिलीं ॥ तो जन्म मांगाचा ॥ १२ ॥ ज्याणे कन्येवरी मनसा केली ॥ तो आंधळा झाला गर्भ स्थळीं ॥ तो भोग भोगावया संसारी ॥ आला असे जन्मासी ॥ १३ ॥ जो लागला नाहीं हरि किर्तनीं ॥ जो वेश्येसीं गेला मिळोनी ॥ एक आतितासीं दुखवोनी ॥ तोही गेला अधःपतनी जाणिजे ॥ १४ ॥ जी भ्रतारा आधीं जेविली ॥ ती वनीं वागुळा झाली ॥ आपुली विष्टा आपण भक्षिली ॥ भूक लागली ये जन्मासी ॥ १५ ॥ ज्या नारीनें आपुले भ्रतारा सांडोनी ॥ पर पुरुष लाविला घ्यानीं ॥ ती नार विवसी होउनी ॥ तोंड काळें करुनि यां ॥ १६ ॥ जिणे केला पतीचा घात ॥ ती बालरांड होउनी जन्मत ॥ जिच्या शब्दासीं नाहीं उचित ॥ ती करीत दुसरीयाची निंदा ॥ ॥

श्रृंगार विलास.

मंगलाचरण आर्या.

जो ईश्वर दीनातें जिवावि कृपेनें हरि हि दुःखातें ॥ नमितों तयासि भावें स्मरणें नासे प्रपंच दुःखातें ॥ १ ॥

भोजन.

मनुष्याला भोजन, प्राशन, निद्रा, आणि संभोग अशा चार प्रकारच्या इच्छा उत्पन्न होतात. त्यांत भोजनेच्छेचा विघात झाला असतां, अंग मोडणें, तोंडाला अरुचि, श्रम, झांपड, नेत्रांना मंदता, धातूचा क्षय, बलाचा क्षय हे विकार होऊन शेवटीं भुक लागल्यावर अन्न न मिळालें तर तो जठराग्नि प्रथम कफादि दोषांना पचवितो. नंतर धातूचा फडशा उडवून अखेर प्राणाला पचवितो. आहार नियमितवेळीं मिळाला असतां बळ, स्मृति आयुष्य, शक्ति, तेज, सत्व, देह धारक असा असून प्राणाला संतुष्ट करणारा आहे. मनुष्यांनीं दिवसातून दोन वेळींच जवावें भोजनाची जागा एकांत स्थल असावें अति ऊष्ण अन्न भक्षण केलें असतां बलाचा नाश करितें. भोजन इतक्या बेतानें करावें कीं दोन भाग अन्न व एक भाग पाणी व एक भाग वायु संचारार्थ राहील. भोजनांतीं पाणी पिलें असतां अनेक रोग उत्पन्न करितें. भोजनोत्तर विष्णू आदिकरून देवांचें स्मरण करावें आणि पोटावर हात फिरवावा आयास पडणारीं कृत्यें करूं नयेत

प्राशन.

जेवूं बसल्यावर प्रथम, किंवा बाहेरून वाट चालून आल्यावर येतांच पाणी पिऊं नये. भोजनांत पातळ पदार्थ जास्त भक्षण केले असतील तर फार थोडें पाणी प्यावें आणि कठीण पदार्थ भक्षण केलें असतां

पाहिजे तितकें प्यावें परंतु जेवण संपल्यावर लगेच पाणी पिल्यापासून फार तोटे होतात, बाकी नियम " भोजनात " सांगितलाचआहे.

निद्रा.

निजतेवेळीं आठ श्वास होईपर्यंत उताणे निजावें मंतर सोळा श्वास होईपर्यंत दक्षिण (उजव्या) कुशीवर निजावें. आणि ३२ श्वास होईपर्यंत डाव्या कुशीवर निजावें मग कांहींवेळ गेल्यावर सारी रात्र डाव्या कुशीवरच निजावें. निजण्यास चांगली मऊ शय्या असावी निजतेवेळीं हे श्लोक ह्मणावे.

जले रक्षतु वाराहः स्थले रक्षतु वामनः ॥ अटव्यां नारसिंहश्च सर्वतः पातु केशवः ॥ १ ॥ जले रक्षतु नंदीशः स्थले रक्षतु भैरवः ॥ अटव्यां वीरभद्रश्च सर्वतः पातु शंकरः ॥ २ ॥ अर्जुनः फाल्गुनो जिष्णुः किरीटी श्वेत वाहनः ॥ बीभत्सु विजयी कृष्णः सव्यसाची धनंजयः ॥ ३ ॥ तिस्रो भार्या कफल्लस्य दाहिनी मोहिनी सती ॥ तासां स्मरण मात्रेण चोरा गच्छंति निष्फलः ॥ ४ ॥

असें ह्मणून त्रिवार टाळी वाजवावी आणि निजावें.

संभोग.

स्त्री पुरुषांचा जो कीं प्रमोद अन्योन्य पूर्ण रति भाव ॥ त्याला कविनें दिधलें रस शृंगाराख्य हेंचि शुभ नांव ॥ १ ॥ भेद तयाचे दोनाचि संभोग हि विप्रलंभ जाणविगा ॥ बाहिरिंद्रिय संयो

में होतो आनंद त्यास संभोगा ॥ २ ॥ मन मि ळणीचीं दोघें आहेत खरीं परंतु विघ्नानें ॥ इष्ट प्राप्तिन झाली त्या लागीं विप्रलंब कविमानें ॥ ३ ॥ त्या श्रृंगार रसाचें दैवत विष्णू कीं रंग ही शा म ॥ ह्मणनि सकळ रसांचा मुगुट मणि पूर्ववर्णि सुख धाम ॥ ४ ॥

विप्रलंभाचें उदाहरण.

प्रति मंदिरिं काननीं जरी ॥ बहु लिलोचित वस्तु सुंदरी ॥ मिळवी तरि कांत नालिया ॥ मग ती अग्निकणासि तोलिया ॥ ५ ॥

स्त्री विचार.

स्त्रीला जोंपर्यंत आठ वर्षांचें वय तों पर्यंत स्त्री जातीस कन्या असें ह्मणतात, पुढें अकरा वर्षां पर्यंत गौरी. नंतर सोळा वर्षांचें वय होईपर्यंत बाला. तीस वर्षां पर्यंत तरुणी, आणि पंन्नासां पर्यंत अधिरुढा मग वृद्धा ह्मणजे ह्मातारी होय.

स्त्रियांच्या जाती व लक्षणें.

आमच्या शास्त्रांत स्त्रियांच्या चार जाती सांगित- ल्या आहेत त्यांचीं नावें. पद्मिनी, शंखिनी, चित्रिणी, आणि हस्तिणी.

पद्मिनी—ज्या स्त्रीचें मुख पूर्ण चंद्रा प्रमाणें सुंदर जिचे स्तन उंच असून मांसल कठीण शोडषवर्षाकृति मृदुअंगी, गौरवर्णा, सुगंधमुखी, अल्प आहारी, मधुर भाषिणी, चतुर, मर्यादशीळ विलासकुशल, देव गुरु यां

चे पूजना विषयीं आतूर, जिचे ओंठ व नेत्र आरक्तवर्ण उपस्थ षडांगुल, कमलगंधी, तळहात अति मृदू, अल्प रति करणारी, ती स्त्री पद्मिणी होय.

शंखिनी—मुख लांबट असून रक्तवर्णा, ओंठ लांब केश फार, विचित्रा, लंबस्तनी, जलद चालणारी, आळशी शब्द घोगरा, मांजरा सारखे डोळे, स्थूल, सहासबुद्धि, फार खाणारी, मद विव्हळा, गर्दभासा रखी गति, उंच रुक्षा जंघन, बाहू ऊर, व केश हे लांबट, नखें आरक्तवर्ण, उपस्थ दहा अंगुळें व क्षिर गंधी, कमर मोठी, ती शंखिणी जाणावी.

चित्रिणी—कमला सारखें मुख, मृगनयना, षोडशव र्षाकृति, चंचळ, क्षमाशीलं, चतुर, गायनकळा जाण णारी, मर्यादशील, शुभ्रवर्णा, मधुरभाषिणी, ओंठरक्त वर्ण, हात व ऊर मांसल, उपस्थ आठ अंगुळें, व मांसगंधी, ती चित्रिणी होय.

हस्तिनी—जिचें अति स्थूल शरीर, मंदगमना, उग्रा, ठेंगणी, खांद व मुख मोठें, केश पिंगट, व निस्तेज, स्तन मोठ, ओंठ लांब, निर्लज्जा. खादाड, गौरवर्णा, हत्तीसारख्या मदाची, मुखास सुगंध, यौवन मत्त, उपस्थ बारा अंगुळें ती हस्तिनी होय.

मनुष्यास स्त्री भोगाची इच्छा उत्पन्न होते त्या काळीं त्यानें भोग न केल्यास मेह, व मेद वाढतात आणि शरिराला अगदीं सैलपणा प्राप्त होतो. पुरुषानें हेमंत ऋतूमध्यें वाजीकरणादि योगानें यथेष्ट काम सेवावा.

व शिशिऋतूंत पाहिजे तितकें मैथुन करावें, परंतु वसं त व शरदृतू यांत तीन दिवसांनीं मैथुन करावें आणि ग्रीष्मऋतूमध्यें पंधरा दिवसांनीं करावें.

मैथुनाला निषिद्धकाल.

पुरुषानें सायंकाळ, प्रातःकाळ, अमवास्या पौर्णिमा गाई सोडण्याचे वेळेस, मध्यरात्रीस, दोन प्रहरीं, जेवल्यावर, अष्टमी, एकादशी, जन्मदिवस, आईबापांचे श्राद्धाचा दिवस, ज्वर येत असेल तेव्हां व्रतांमध्यें, मार्ग क्रमण करून श्रम झाले असतील तेव्हां शहाण्यानें कदापी स्त्री समागम करूं नये. आणखीं फार भोजन केलेला अधीर, भुकेला, रोगी, तृषार्त, बाळक, म्हातारा, मैथुनानें रोग वाढणारा अशा पुरुषांनी संभोग करूंनये. भुकेला, उद्विग्नचित्त, दोनप्रहरीं, ताहानेला, दुर्बळ, क्षयी असा पुरुष संभोग करील तर त्याचा रेताचा नाश होऊन वातकोप होईल. आणि रोगी असून संभोग करील तर त्याला रोग, घेरी, व मृत्युही प्राप्त होतील.

अति संभोग.

अति मैथुन केल्यापासून पोटशूळ खोकला, दमा, पांडू, ज्वर, कृशपणा, क्षय इत्याद्यनेक रोग उत्पन्न होतात. दृष्टांत

मैथुनंतु शरिरस्य सुखदंच प्रकीर्तितं ॥ अति व्यवायो रोगाणां कारको भिषजे स्मतः ॥ १ ॥

ह्मणजे मैथुन हें शरिराला फारच सुख देणारें आहे खरें परंतु जास्त उपयोगाचें नाहीं.

संभोग विधि.

पुरुषानें स्त्री भोग आपल्याहून वडील मनुष्यां च्या समीप, व उघडी, लज्जाकर, दुःखाचे शब्द- ऐकुं येतात अशा जागीं स्त्रीशीं रत होऊं नये. स्नान करून आंगास सुगंध चंदन सुगंध पुष्पांच्या मा ळा याचें धारण, व धातु वृद्धि करणारे पदार्थ भक्षण उत्तम वस्त्र, अलंकार, व उत्तम वेष यांचें धार ण करून मैथुनास प्रवृत्त व्हावें.

रति करण्याचे पूर्वी स्त्रीनें आपल्या घरांत विस्ती- र्ण आणि सुंदर दिवाणखान्यात सफती देऊन शो भिवंत करून त्या मध्यें उंच आणि सुंदर असा पलंग मांडून, धूप. दीप याणी सुवाशीत अशी ती जागा करावी. आणि गायनाचीं जीं साहित्यें विणा इत्यादि तशींच संगीत शास्त्राचीं पुस्तकें ही जवळ ठेवावी. हा विचार तरी सूर्य अस्तास गेल्या नंतर चार घटका पर्यंत प्रदोषकाळ सोडून पश्चात् स्त्री स- हवर्तमान पुरुषानें रममाण व्हावें. प्रदोषकाळीं उभ यतां रममाण झालीं असतां पतीचे आयुष्याचा नाश होतो आणि स्त्री नरकांत जाते. संभोग काळीं पती चे शरीरास पादस्पर्श, स्त्रीचें उच्छिष्ट भक्षण ताडण कोप, रोष निर्भत्सना इत्यादि शास्त्रांत स्त्रीचे दोष असे मानले नाहींत, यास्तव नवऱ्यानें ही ते दोष

असें समजूं नये. अंगात चोळी घालून स्त्रीनें पती संग करूं नये. केला असतां त्या स्त्रीला वैधव्य प्राप्त होईल. संभोगकाळीं स्त्रीनें काळें वस्त्र नेसूं नये. जर तें वस्त्र धारण करून पतीशीं संभोग केला आणि गर्भ धारण झाला, तर तो प्राणी चांडाळ तुल्य नष्ट उत्पन्न होईल.

यास्तव तसें वस्त्र नेसूंनये. धुतलेलें पांढरें वस्त्र नेसून डोळ्यांत काजळ घालून, अनुकूल असेल तर केशराची उटी लावून, तांबुल भक्षण करून व भांगामध्यें शेंदूर घालून संभोग करावा. या काळीं हे पदार्थ शुभकारक आहेत. पुरुषानें स्त्री संभोग स्त्री अनुकूल असेल तरच करावा. ती दुर्मुखी किंवा क्षुधायुक्त किंवा रोदनयुक्त अशी असेल तर बलात्कारें करून संग करूं नये. याचा निषेध आहे. कारण मैथुनकालीं उभयतां प्रसन्नचित्त असलीं तर सात्विक सूख मिळणार आहे. यास्तव पत्नीनें पतीचे पाद प्रक्षालन करून, अनुकूल असेल तर पतीचे शरीरास उटी देण्याकरितां कस्तुरी दोन भाग, चंदन दोन भाग, हे पदार्थ एकत्र करून त्याची उटी पतीचे सर्वांगास द्यावी. यास 'यक्षकर्दन' ह्मणतात. हा सर्वत्रांस सुखकर आहे. इतके पदार्थ न मिळतील तर चंदनादि पदार्थांची उटी पतीचे शरीरास द्यावी व नानातऱ्हेचे पुष्पांचे हार पतीला अर्पण करावे. तसेंच तापलेलें दुधांत साखर, जायफळ केशर, बदाम, व कस्तुरी, इत्यादि पौष्टिक पदार्थ घालू-

न तें खरपूस तापवून पतीस द्यावें नंतर आचमनार्थ उदक देऊन विडा द्यावा मग त्या स्त्रीनें पतीचे उच्छिष्ट असतील ते भक्ष्य भोज्य तांबुलादि सर्व पदार्थ सर्व काळीं व त्या काळीं भक्षण करावे. पतीनें मात्र मैथुन प्रसंगा वांचून स्त्रीचें उचिष्ट ग्रहण करूं नये. हा संपूर्ण व्यवाहार झाल्या नंतर पतीचे पांयावर मस्तक ठेवून पतीचे ठायीं ईश्वर भावना करून, ह्मणजे हा ईश्वर आहे असें जाणुन, मग पतीशीं मैथुन करण्या विषयीं प्रवृत्त व्हावें. संगकाळीं आपले कुळांत प्रसिद्ध प्रतापी पुरुष झाले असतील त्यांचें किंवा अन्य ऋषी किंवा देव इत्यादिकांचें स्मरण करावें. ह्मणजे संतती चांगली होऊन त्या स्त्रीला अत्यंत सुख होतें व प्रजा चांगली होते. असें केलें नाहीं तर ती स्त्री दुःखी राहते. पतीनें मैथुनकाळीं आपली शिखा मुक्त करून यज्ञोपवीत साखळी सारखें करून पुरुषोत्तम भगवान विष्णू यांचें स्मरण करावें ह्मणजे पुत्र चांगला होतो. या प्रमाणें मैथुन कृत्य समाप्त झाल्या नंतर निद्राकाळीं त्या स्त्रीनें चोळीच्या वाऱ्यानें दीप शांत करावा. तो गेल्यानंतर शय्येवर जावें. सोळा दिवसांचे ऋतुकालांत पतीनें स्त्रीशीं संग अवश्य करावा कारण तिला गर्भ राहील ही शंका आहे, स्त्रीच्या दृशादिकें करून गमन न केलें तर भ्रूण हत्येचें पातक लागतें.

ऋतु काळ ह्मणजे रजस्वला झाल्या पासून १६

दिवस पावेतों समजावा. त्यांत पहिले चार आणि ते रावा, चवदावा हे दिवस खेरीज करून सम दिवस ४–६–८–१०–१२–१४ यांचे ठायीं संयोग झाला असतां पुत्र होतो आणि विषम दिवस ५–७–९–११ १३–१५ यांचे ठायीं स्त्री संयोग झालाअसतां कन्या होते असें जाणून ज्या पुरुषाला आपत्याची इच्छा आहे आणि ज्याचा काम शुद्ध आहे ह्मणजे कोणत्या ही प्रकारचा रोग रहित त्या पुरुषानें इच्छे प्रमाणें त्या त्या दिवशीं संभोग करावा ह्मणजे इच्छित फल प्राप्त होतें. पूर्वोक्त समदिवशीं स्त्रियांचें रज अल्प असतें. यास्तव त्या दिवशीं जी स्त्री पुरुष भोगिते ती पुत्र प्रसवते. आणि विषम दिवशीं आर्तव फार असतें. यास्तव जी स्त्री पुरुष संयोग करिते ती कन्या प्रसवते. असें विदेह वचन आहे. गर्भादान कालीं शुक्राचा आधिक पणा झाला असतां पुरुष गर्भ होतो आणि स्त्री रजाचा अधिक पणा झाला असतां स्त्री गर्भ होतो व दोहोंचें साम्य झालें असतां नपुंसक गर्भ होतो. मूत्राशय द्वाराच्या आधोभागीं उजव्या बाजूकडे दोन दोन अंगुळांवर जी मूत्र वाहिनी आहे. तिच्या मार्गा पासून पुरुषाचें वीर्य प्रवृत्त होतें. जी स्त्री पुरुषाला खालीं घालून आपण पुरुषा सारखी वर चढून मैथुन करिते तिला त्या समयीं गर्भ राहून कंन्या उत्पन्न होते किंवा षंढ उत्पन्न होतो आई बाप जसे आहार, आचार, चेष्टा याणी युक्त असून संभोग करतात तसे

गुण गर्भाचे ठायीं होतात. स्त्री संयोगानें पुरुषाचें नुसतें वीर्य गळतें तें गर्भ धारणाचे उपयोगा पडत नाहीं. योनीपासून रक्तस्त्रवत असतां जर तींत वीर्य प्रविष्ट झालें तर तें गर्भाचे उपयोगी पडणार नाहीं. जसें नदीच्या प्रवाहांत वाहाणारा काष्टादिक पदार्थ वाहून जातो, वर चढत नाहीं त्या प्रमाणें. स्त्रिपुरुषांनीं स्पर्श विशेषाचे इच्छेकरून आरंभलेला संभोग त्याचे ठायीं दोघांच्या इंद्रियां पासून उत्पन्न झालेला उष्मा ह्मणजे दाह त्याचे योगानें रेत (शुक्र) पातळ होऊन वायूच्या संयोगानें स्वस्थाना पासून सुटून योनीमध्यें जाऊन रक्ताशीं मिळतें. गर्भ धारण झाल्यानंतर आर्तव वाहिन्याचीं तोंडें गर्भानें बंद पडून तें आर्तव दिसत नाहीं, ह्मणजे विटाळ बंद होतो. पहिल्या दिवशीं ऋतुमतीचे ठायीं गमन व्यर्थ जाणावें. कारण त्या दिवशीं स्थापित जो गर्भ तो उत्पन्न होतांच प्राण सोडितो.. दुसरे दिवशीं स्थापित गर्भ उत्पन्न होतांच अगर दहा दिवसांत मरतो. तृतीय दिवशीं उत्पन्न होतांच मरतो अथवा असंपूर्णांग ह्मणजे थोटा, पांगला, लुला, किंवा अल्पायु होतो. चवथे रात्रीचे ठायीं संपूर्ण अंग व दीर्घायु असा होतो पुढें तर उत्तमच. पुरुषानें रात्रीच्या ठायीं एकवार स्त्री समागम करावा. जास्त वेळां करूं नये.

मैथुनांतीं हिताबद्द.

मैथुन कृत्य संपल्यावर स्नान, साखर मिश्रित दूध,

उसाच्या रसापासून केलेला पदार्थ, शीतळवायु, मांसरस, निद्रा इतके पदार्थ हितकारक आहेत.

गर्भ धारण वेळीं भाव.

नारीच्या रतीचा अंत झाला असतां चळवळ करूं लागेल, वल्गना फार करील, डोळ्यांतून पाणी व केवळ प्रेमांत येईल, आणि डोळा थोडा अर्धा मिटील, व मोठ्या प्रयासानेंही मग तिच्यानें कांहीं चाळे सोसवणार नाहींत, तहान लागेल, शरीराला ग्लानी येईल, मांड्या फार थकतील, स्त्री शय्येवरून उठल्यावर शुक्र शोणित बाहेर पडणार नाहीं. व योनी स्फुरण पावेल. स्त्री गरोदर झाल्यावर तिच्या स्तनाचीं अग्रें काळसर होतात. अंगावर रोमांच उभे रहातात, डोळ्यांच्या पापण्या एकमेकाशीं मिळतात. उगीच ओकारी येते, उत्तम गंध सेवनें करून मन त्रास पावतें. तोंडाला पाणी सुटतें, शरीर कृश होतें, दिवसें दिवस स्तन मोठे दिसूं लागतात. मंद गतीनें छाती काढून चालते. उमासे येतात. वांति होते, इत्यादि लक्षणें दिसूं लागलीं कीं गर्भ धारण झाला असें समजून त्या स्त्रीस आयास पडणारीं कृत्यें करूं देऊं नयेत. व तिनें हीं करूं नयेत. त्यांत ज्या पदार्थें करून तृप्ती होत नाहीं तसे पदार्थ सेवन, अधीक भक्षण, रात्रीस जागरण, संभोग करणें

गाडा, घोडा, इत्यादिकांवर बसणें, वांकडे तिकडे ह स्त पादादिकरून बसणें, उंच सखल आसनावर ब सणें मलमुत्राचा रोध करणें इत्यादि वर्ज करावें

संतती होण्यास उपाय.

कोणी एका सिद्धानें लोकोपकारार्थ हा उपाय सांगित ला आहे. स्त्रियांना संतती प्रतिबंधक सात प्रकारच्या खोडी असतात त्या येणें प्रमाणें.

१ फूल फिरलें ह्मणजे गर्भ धारण होत नाहीं २ फु लांत वायू असतो तो गर्भ ठरूं देत नाहीं. ३ फुलावर मांस वाढतें ह्मणून बिंदू जाण्यास वाट नाहीं. ४ फुला वर कृमी पडतो तो बिंदु खाऊन टाकतो. ५ फुलावर जाळें चढलें ह्मणजे बिंदूचें रक्त होतें. ६ फुलावर शीं तळाई असली तर बिंदूचें पाणी होतें. ७ पिशाचिक पीडेनें बिंदू नाहींसा होतो.

गर्भ वृद्धीवर—एरंड मुळांचा काढा करून त्यां त खडीसाखर घालून १४ दिवस देणें नंतर गाईचे तुपांत मासाभर केशर खलून सात किंवा १४ दिवस द्यावें, पुरुष संग मात्र वर्ज.

ऋतु काळीं संभोग केल्यावर स्त्रीचे शरीरांत क शी भावना होते तें स्त्रीस विचारावें व त्या वरून कोणती खोड आहे तें पहावें.

१ स्त्रीच्या सर्व संधी दुखत असल्यास फूल फि

रलें आहे असें जाणावें. त्यावर सरक्यांचा मगज कोंबड्याचे पित्तांत खलून कापूस भिजवावा. तो योनींत धरून वर पुरुषानें रमावें. या प्रमाणें 'तीन ऋतू पर्यंत तीन तीन दिवस करावें ह्मणजे पुत्र संतान होईल. २. अंग भोंवत असलें तर फुलांत मांस चढलें आहे असें जाणावें. त्यावर द्वीपद्राक्षा तोळे दोन तिळेलांत खलून कापूस भिजवून योनींत धरून वरप्रमाणें करावें. ३. मान दुखत असली तर फुलांत मांस चढलें आहे असें समजावें. त्यावर साबणाचे पाण्यांत सज्जिखार, हिरडा, आणि बेहेडा कुटून वस्त्रगाळ करून टाकावा आणि बारीक खलकरून कापूस भिजवून योनींत धरून वरचे प्रमाणं करावें. ४. पोटऱ्या दुखत असल्यातर फुलावर कृमी पडले असें जाणावें. त्यावर जिरें, हत्तीच्या मागल्या पायांचीं नखें कुटून तुपांत तळावीं आणि त्यांत कापूस भिजवून योनींत ठेवावा बाकी वरचे प्रमाणें करावें. ५ मांड्या दुखत असल्या तर फुलावर जाळें चढलें आहे असें जाणावें. त्यावर गूळ, बाळअंबा आणि आलें हीं तिन्ही समभाग घेऊन कुटावीं आणि फडक्यास लावून योनींत ठेवावें किंवा धायटीचें फूल तेलांत खलून त्यांत कापूस भिजवून योनींत धरावा आणि वरप्रमाणें करावें. ६. ऊर दुखत असलातर फुलांत थंडी आहे असें जाणावें. त्यावर कोष्टकोळिंजन, शहाजिरें, जायफळ, धायटीचें फूल, हीं औषधें

वस्त्रगाळ करून तिळांचे तेलांत खलावीं त्यांत कापूस भिजवून योनींत धरावा आणि वरप्रमाणें करावें. ७. कांहींच दुखत नसल्यास पैशाचिक पीडा जाणावी. त्या जवर ओंवा, शेवग्याचें मूळ, पांढऱ्या कण्हेराचें मूळ याचें समभाग चूर्ण पांढरे वसूचे रसांत कालवून ऋतूकाळीं योनीस आंतल्या बाजूनें लेप द्यावा. ह्मणजे पिशाच्च पिडेची बाधा न होतां नष्ट फूल जळून जाईल.

उटी.

चैत्रमासांत गौरीचा उत्साह करितात. त्यावेळीं स्त्रिया एकमेकींस उटी लावितात, त्याच प्रमाणें कामज्वरांत शीतलता येण्या साठीं अंगास चंदनादि शीतल सुवासिक द्रव्यांची शरिरास उटी लावावी ह्मणून वैद्य शास्त्रांत सांगितलें आहे.

प्राचीन कालीं राजे, ऋषी व त्यांच्या स्त्रिया व मुली इत्यादिकांस अन्य पुरुष व स्त्रियांच्या अवलोकनानें कामवासना उत्पन्न होऊन त्या कामाच्या स्वाधीन झाल्या नंतर त्या पासून अधिक पीडा न होतां शीतलता वाढावी या साठीं चंदनादि शीतल पदार्थांच्या उट्या अंगास लावीत असत. त्या उट्या शरीरास वाईट न दिसाव्या आणि त्यां पासून सुख उत्पन्न व्हावें ह्मणून उटीच्या गंधानें ऊर, भुजा

इत्यादिकांवर चित्रें व वेलबुट्या काढण्याचा संप्रदाय होता असें प्राचीन पुराणादिक ग्रंथां वरून समजतें.

सुवासिक पांढरा चंदन व कापूर उगाळून त्याचा लेप करितात आणि त्या उटच्या चांगल्या दिसाव्या ह्मणून नखानें रेघा पाडतात.

प्रकार १ ला— नागरमोथे १ भाग, कोष्ट २ भाग, लोहबाण २ भाग, कापूर २ भाग, हिरडेदळ ४ भाग, शिलारस ६ भाग, नखला ९ भाग, हीं पांच द्रव्यें घेऊन बारीक वांटावीं आणि त्यांत पाणी घालून पातळ गंधा प्रमाणें सरबरीत करून अंगास मर्दन करावें.

प्रकार २ रा.—नागकेशर १ भाग, शिलारस १ भाग, चंदन २ भाग, नागरमोथे २! भाग, धुपगणेरी १ भाग, कापूर ॥ भाग, जायफळ ॥ भाग, लोहबाण ॥ भाग, कस्तुरी १ मासा. या द्रव्यांचें फार बारीक चूर्ण करून विड्याच्या पानांच्या रसांत कालवून अंगास उटी द्यावी तणेंकरून सुगंध फारच नामी येतो. यास कस्तुरी अंगराज असें ह्मणतात.

प्रकार ३ रा. हिरडेदळ, वेखंड, नख, नागरमोथे जटामासी, शोपा आणि करंजबीज हीं द्रव्यें एकेकभाग केवड्याचें पाणी २ भाग, कापूर, जायफळ, लोहबाण. हीं चार द्रव्यें तीन तीन भाग एकत्र करून पाणी घालून बारीक वाटावीं आणि अंगास लेप करावा.

उटणीं.

प्रकार १ ला.—आंवळकठी पाण्यांत भिजत घालून त्याच पाण्यांत बारीक वाटून त्याचें अंगास मर्दन करावें व सर्व अंग सुकल्यावर नंतर करीत जावें या प्रकारें दररोज करीत गेलें असतां अकाळीं केंस पांढरे होत नाहींत व अंगास घर्म व दुर्गंध घेत नाहीं. फारच उत्तम आहे.

प्रकार २ रा.— कडुनिंबाचीं पानें, कमळाचें मूळ, लोध, आंवळकाठी आणि डाळिंबाच्या फळावरील साल हीं समभाग घेऊन पाण्यांत बारीक वांटून त्याचें शरिरास उटणें लावून नंतर स्नान करावें. म्हणजे उष्ण काळांत घाम फार न येतां शरीरास सुवास येईल.

प्रकार ३ रा.— शिरसवृक्षाचें केंशर, वाळा, लोध, हीं औषधं सम भाग पाण्यांत वांटून अंगास लावून स्नान केलें असतां घाम येणार नाहीं.

प्रकार ४ था.—वेलचीदाणे, नागरमोथे, नख, सोनकेवडा, जटामासी, कचोरा, आणि तमालपत्र, हीं समभाग पाण्यांत वाटून स्नान केल्यास सुवास येईल.

प्रकार ५ वा.—आंवळकाटी, सोनकवडा, नागरमोथे, वाळहिरडे, जटामांसी, कचोरा, आणि तमालपत्र हीं द्रव्य समभाग घेऊन पाण्यांत वाटून अंगास लावून स्नान केलें असतां उत्तम सुवास येतो.

प्रकार ६ वा.—कलमीदालचिनी, जायपत्री, वे

लदोड्याचेदाणे, नागरमोथे, कचोरा, शेवग्याच्याबिया, आणि वाळा हीं समभाग पाण्यांत वाटून अंगास मर्दनकरून नंतर स्नान केलें असतां कसासु चांगला सुगंध येतो.

प्रकार ७ वा.—कापूर,कुंकू लोध, वाळा, नागर मोथे, धूप, कण्हेरीचेंमूळ, हीं द्रव्यें समभाग घेऊन पाण्यांत वांटून अंगास लावून स्नान केलें असतां अं ग.ास सुगंध येतो.

प्रकार ८ वा.—हरभऱ्याचें पीठ व तेल एकत्र करून अंगास लावून मळकत्या काढल्या असतां त्याजबरोबर अंगाची सर्व घाण व मळ निघून शरीर स्वच्छ होतें.

अंगास लावण्याचें तेल.

तिळेल २०तोळे, सुंठ अर्धतोळा, जायफळ १ तो ळा, लवंगा अर्ध तोळा, कापूर एक तोळा, तुरटी अ र्ध तोळा, हीं द्रव्वें कुटून बारीक करून तिळेलांत घा लून कढाविणें ह्मणजे अंगास लावण्याचें उत्तम तेल झालें. २ तिळेल २० तोळे, जिरें १ तोळा, कंकोळ २ तोळे, कापूर २ तोळे हीं वरील तलांत् कढवून शिशांत ठेवून पाहिजे तेव्हां अंगास लावीत जावें.

योनि संकोचन.

१—मायफळ व तुरटीची लाही वस्त्रगाळ करून बारीक वस्त्रांत बांधून योनींत ठेवावी.

२—मायफळ व कापूर सम भाग मधांत खलून योनीस आंतून लेप द्यावा.

३—बाभळीच्या कोंवळ्या शेंगाचा रस काढून त्यांत चिरगुट भिजवून योनींत ठेवावें.

४—शेवग्याचे मुळीचा काढा करून योनीवर शिंपावा.

वाजीकरण.

वाजीकरण ह्मणजे जो पुरुष अशक्त असतो त्यास शक्ती येण्या जोगा उपाय तो. १ रक्त्याबोळ मनशीळ, कोष्ट, शोप, आणि टाकणखार यांचें चूर्ण समभाग तिळेलांत खलून लिंगाला लेप केला असतां लिंग वृद्धिंगत होतें २ बिबे, पादेलोण, कमळाचीं पानें हीं जाळून ती राख रिंगणीच्या फळाच्या रसांत भिजवावी आणि आदीं लिंग महिषीच्या शेणानें मर्दून त्यावर-तें भस्म लावावें ह्मणजे लिंग स्थुलीकरण होतें. ३ कांटे शेंवतीच्या रसांत समभाग तूप घालून त्याचे दसपट त्यांत दूध घालून त्यांत कांहीं मद व कांहीं साखर घालून खावें फारच उत्तम. ४ जेष्टमधेचे चूर्ण तूप व मध या मध्यें मिश्रित करून प्यावें आणि वर दुधाचे घोंट घ्यावेत पुष्टतेस उत्तम. ५ मनुका, खडीसाखर, मध, व पिंपळी हीं सममाग करून घेणें पथ्य गाईचें दूध भात. ६ कांद्याचा रस व मध एकत्र

करून देणें ह्मणजे शरीर पुष्ट होतें. ७आंवळ्याचा रस व तूप एकत्र करून घेणें. गाईचे तापलेले दुधांत तूप वचांगली पिठीसाखर घालून तें निजते वेळीं द्यावें.

व्यसन निषेध.

सर्व व्यसनामध्यें परस्त्री संग हा फारच घातुक आहे. पूर्वीं जानकीच्या ग्रहणे करून रावणाचा कुलक्षय जाहला हें समग्र रामायणांत आहे. तारेच्या अभिलाशानें वाळी प्राणास मुकला. द्रौपदीच्या छलें करून कीचक बंधूवर्गासह क्षयास गेला या प्रकारें जो पुरुष परस्त्रीच्या अभिलाशाची इच्छा धरीत गेला तो नाश पावला यास्तव परस्त्रीची वांच्छा मनानें ही करूं नये. हा वेश्या सौंदर्य इंधनानी केवळ मदनाची ज्वालाच आहे. जो मध्यें विषयी पुरुष आपलीं तारुण्यें आणि द्रव्यें ही जाळितात. अहो तिचा अधरोष्ट सुंदर आहे खरा; परंतु उत्तम कुलोत्पन्न पुरुष कोण चुंबन करील बरें; कारण. चंडाळ, चेटकी, दूत राजा चोर, आणि कामी अशा पुरुषांचें थुंकावयाचें पात्रहोय ह्मणून. बांधवहो; परस्त्री भोगिल्यानें आयुष्याचा क्षय होतो शरीर निःसत्व होतें, लोकांत उपाहास्यता होते. सर्व लोक निंदा करितात द्रव्याचा क्षय होतो. अनेक रोग जडतात आणि इहपर लोकीं दुःख भोगावें लागतें.

ज्याला लग्नाची स्त्री आहे किंवा लग्न करणें असेल त्यानें वेश्येचा समागम करूं नयें पराची स्त्री ह्मणजे केवळ माताच समजली पाहिजे. स्त्रीनें ही पर पुरुष देवादिकां सारखा सुंदर असला तरी त्याजकडे पापदृष्टीनें न पाहतां लग्नाचा पती असेल. त्याशींच रत व्हावें कुबडा, थोटा, नपुंमक असा पती मिळाला तरी त्याचे वरची भक्ती कमी करूं नये. परमेश्वरा वर भक्ती ठेवून वर्तत असावें आहार, निद्रा, मैथुन इत्यादि क्षुल्लक सुखें अन्य योनींत हीं मिळतात. जो मनुष्य एक वेळ दुर्व्यसनें करून लिप्त झाला, ह्मणजे त्याचे मुखीं लबाडीनें सदोदित वास केला आहे असें खचित समजावें व त्याचे बोलण्या चालण्या वर बिलकुल भरंवसा ठेवितां येत नाहीं मनुष्यास विशेषें करून व्यसनीं असल्या मुळें कर्जाच्या तोंडांत पडावें लागतें आणि त्यास लबाडी ह्मणतात. परंतु त्या पासून श्रीमानलोक एवढे भिकेस मिळालकीं त्यांचे शेवटीं खाण्यापिण्याचे हाल झाले असे अमचे नजरे समोर अनेक सांपडतील. पण सुखी झालेला असा एकही मिळणें कठीण. असें आह्मी अवलोकन करीत असतां व्यसनांध होणें ही किति मूर्खपणाची गोष्ट. झालें सारांशकाय कोणतेंही व्यसन असूंनये व या व्यसनापासून निराळा जो परमेश्वर त्याचें प्रति दिनी आनंदें करून स्मरण करित असावें. ह्मणजे तेंच उभयजगीं सर्व सुखाचें माहेर घर होईल. आणि

तोच आह्मांला सर्व व्यसनापासून किंवा हरएक संक टांतून रक्षील

अन्याय कोणाकडे.

जन्मापासुनि काळ हा दवडिला त्वां व्यर्थ माझा हरी ॥ नाहीं साधन साधिलें तिळभरी कां नि र्मिली वैखरी ॥ संध्या स्नान जपार्चनादिक पु जा तूझी मला ना घडे ॥ कर्ता तूंचि हरी ह्मणो नि पुसणें अन्याय कोणाकडे ॥ १ ॥ कृष्णा स त्तर दोनशें दिन मला गर्भीं तुवां घातलें ॥ गर्भा पासुनि सोडुनी हरि पुढें अज्ञान रे दीधलें ॥ तें निर्दाळुनियां हरी विषयिंता गोंवीयलें स्त्रीकडे ॥ कर्ता तूंचि हरी ह्मणोनि पुसणें अन्याय कोणाक डे ॥ २ ॥ ऐसा किंचित काळ घालुनि पुढां सं सार्णवीं व्यापिलें ॥ गेलें व्यर्थ नरार्जवादि करु नी आयुष्य रे चांगलें ॥ केलें पोषण दान घेउ नि हरी वार्धक्य हेंही जडे ॥ कर्ता तूंचि हरी म्हणोनि पुसणें अन्याय कोणाकडे ॥ ३ ॥ झालें वार्धक देह तोहि गळला कांति पहा भंगिली ॥ चक्षु घ्राण गळे मुख स्त्रवतसे काया हरी वीटली कर्णादीकाहि पाद दंत अवघे जिव्हा हरी ना तु डे ॥ कर्ता तूंचि हरी म्हणोनि पुसणें अन्याय कोणाकडे ॥ ४ ॥ ऐसें भाषण श्रीहरी परिसुनी

प्रत्युत्तरा दीधलें ॥ जैसें तूं वदलाशी मानव मु
खीं अम्हाकडे लाविलें ॥ जैसें संचित पूर्वीचें तव
असे तें भोगणें रे घडे ॥ कर्ता कोण ह्मणोनि पु
सणें अन्याय कोणाकडे ॥ ५ ॥ कर्ता निर्मित
मी असें तुज नरा सत्कर्म तूं नातुडे ॥ ऐसें मी
तुजला जसे शिकविलें प्रारब्ध तूझे कडे ॥ तूं सा
ठीं घटिकांतुनेक घटिका श्रीसाधना नाघडे ॥
कर्ता कोण मनीं विचारुनि पहा अन्याय कोणा
कडे ॥ ६ ॥ अज्ञानें न कळे तुला मति ऱ्हदीं कै
सा भजावा हरी ॥ झालें ज्ञान तधीं असेल जरि
तुं वां आठविला हरी ॥ तेव्हां तूं विषयांत मग्न
दुसरें मित्रत्व तुह्मांकडे ॥ कर्ता कोण मनीं विचा
रुनि पहा अन्याय कोणाकडे ॥ ७ ॥ नाहीं ती
र्थ विलोकिलें जनिं तुवां नाहीं हरा पूजिलें ॥
नाहीं भोजन घातलें द्विजवरा नाहीं हवीं होमि
लें ॥ गो भूमी तिळ वस्त्रहीन उदका द्याया मती
नातुडे ॥ कर्ता कोण मनीं विचारुनि पहा अ
न्याय कोणाकडे ॥ ८ ॥ ॥ ॥

व्यंकटेश स्तुति.

व्यंकटेशजी नाम चांगले । आवडे मला चित्त
रंगलें । ध्यान मानसीं लागली प्रिती । पावगा
त्वरें लक्षुमी पती ॥ १ ॥ देखिली तुह्मी दूर

नीं पुरी । हर्ष वाटला बहुत अंतरीं । ध्यान मानसीं लागली भिती । पावगा त्वरें लक्षुमी पती ॥ २ ॥ व्यंकटेशजी स्वामि राजसा । पाव सी मला हाचि भर्वसा । ह्मणुनियां तुझी मांड ली स्तुती ॥ पावगा त्व० ॥ ३ ॥ व्यंकटेशजी तूज वेगळें । दीन दीसतों दारि पाउलें । करु णांतरीं भाकिजे किती । पावगा त्वरें लक्षुमी पती ॥ ४ ॥ व्यंकटेशजी कूळ देवता । तूंचि श्रीगुरू माउली पिता । इष्ट मित्र बंधवन्न संपती । पाव गा० ॥ ५ ॥ त्रिभुवनासिया तूंचि रक्षिता । शेष शीणला गुण वर्णितां । वेद हीं तुझी नेण ती स्तुती ॥ पाव गा० ॥ ६ ॥ कमळजा पती कम ल लोचना । कमल श्रीगुरू भक्त रक्षणा । कम ल श्रीगुरू ब्रीद गाजती । पावगा त्वरें० ॥ ७ ॥ साधना तरी काय मी करूं । भक्ति कोणती सांग हो धरूं । तीर्थ यात्र हीं फीरलों किती । पावगा० ॥ ८ ॥ हृदय फूटलें कंठ दाटला नीर लोचनीं पूर सूटला । धीर मी धरूं मानसीं कि ती ॥ पावगा० ॥ ९ ॥ उशिर हा तरी फार लाग ला । मार्ग लक्षितां दीन शीणला । अझुनि ही किती अंत पहासी ॥ पाव० ॥ १० ॥

समाप्त.

८२६१५

कठीण शब्दांचे अर्थ.

१ नदी.
२ मिळती.
३ समुद्र
४ बायका.
५ भोग.
६ अमृताप्रमाणें.
७ पलंग.
८ निजणें.
९ लेष्मा—शेंबुड.
१० बायका.
११ खिन्नजाहली.
१२ संकटें.
१३ पातीं न हालावितां
१४ आई,
१५ आदळतां.
१६ काठी.
१७ गोपी.
१८ तरुणी.
१९ गोपी.
२० कमलमुखी.
२१ स्त्री.
२२ संभोग.
२३ हरिणमुखी,
२४ लवकर.
२५ धैर्यानें.
२६ पाणी.
२७ लोकांचा जमाव.
२८ श्रीकृष्णास.
२९ गृहशाला.
३० तेज.
३१ गोकुळ.
३२ चकभुलीत होऊन
३३ स्त्री.
३४ लग्न.
३५ अग्नींत.
३६ विश्वासता.
३७ नंद.
३८ पातकाला.
३९ पोपट.
४० कोकिला.
४१ दटावी.
४२ यशोदा.
४३ श्रेष्ठाला.
४४ हात.

४५ राहणारा.
४६ पवित्र.
४७ श्रीकृष्ण.
४८ रात्र.
४९ वेश्या.
५० सूर्याला.
५१ श्रीकृष्णानें.
५२ वेश्या.
५३ ब्रम्हदेव.
५४ राधेचा बाप.
५५ रमली.
५६ अप्सरा.
५७ मदनानें.
५८ हार.
५९ दरवाजा.
६० अस्थिर.
६१ आडणा.
६२ खालचाओंठ.
६३ उत्पत्तीस्थान.
६४ कृष्ण.
६५ मैथुन.
६६ स्तनावर.
६७ महादेव.
६८ नखानें.
६९ पदकमलाला.
७० पृथ्वीला.
७१ कमलनयना.
७२ वस्त्र.
७३ चोळी.
७४ केश.
७५ कपाळीं.
७६ चांडाळा.
७७ कमलनेत्रीं.
७८ पुरुष.
७९ वासाला.
८० मरण.
८१ नवरा.
८२ भोंग्याचींघरें.
८३ पृथ्वी.
८४ हात.
८५ आडण्यास.
८६ घुसळण.
८७ आवड.
८८ सखी.
८९ मदना.
९० उंच सखल.
९१ काढी.
९२ पलंग.

९३ महादेव.
९४ स्त्री.
९५ अमृत.
९६ कौतुकें.
९७ तारुण्य.
९८ कमळ.
९९ कुले.
१०० बिछान्यावर.
१ मांड्या.
२ वि०स्त्री०वर्णन.
३ प्रेमानें.
४ मैथुन.
५ पदरानें.
६ चळ.
७ अश्रु.
८ तोंड.
९ नाक.
१० तोंडल्याप्रमाणें.
११ मान.
१२ पदराला.
१३ उंदीर.
१४ बिळांत.
१५ व्यभिचारी,
१६ उत्कट इछा.
१७ मिषानें.
१८ मदन.
१९ कमरेंत.
२० वनातें.
२१ गौळणी
२२ रक्तवर्णओंट.
२३ लक्ष्मीहून.
२४ मदन,
२५ कौतुक.
२६ पेटवी.
२७ नखांनीं.
२८ चोळीच्या.
३० ब्रह्मचारी.
३० शिमगेपौर्णिमा.
३१ दसरा.
३२ गोकुळीं.
३३ कमलवदना.
३४ आपल्याघरास.
३५ ब्रह्मदेव.
३६ कार्तीकस्वामी.
३७ इंद्र.
३८ कुबेर.
३९ पंचांग.